RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

अमरावती
२५ रविवार
जानेवारी २०२६
✲ वर्ष ५ ✲ अंक २४०
✲ पृष्ठ : ४ ✲ मूल्य रु : ३

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

## काँग्रेसबाबतचे काही मुद्दे पक्षनेतृत्वासमोर मांडणार : शशी थरूर

■ कोझिकोड: काँग्रेसबाबत माझे काही मुद्दे असून, ते पक्षश्रेष्ठींसमोर मांडणार आहे, असे त्या पक्षाचे नेते व खासदार शशी थरूर यांनी शनिवारी सांगितले. संसदेतील कामकाजात मी कधीही काँग्रेसच्या अधिकृत भूमिकांचे उल्लंघन केलेले नाही, असा दावाही त्यांनी केला. ते म्हणाले की, कोणत्याही अंतर्गत मतभेदाची चर्चा प्रसारमाध्यमांतून नव्हे, तर पक्षाच्या चौकटीतच झाली पाहिजे. कोची येथे नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आपल्या उपस्थितीची योग्य दखल न घेतल्यामुळे थरूर नाराज असल्याच्या व राज्यातील पक्षनेत्यांकडून त्यांना वारंवार बाजूला सारल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या त्या पार्श्वभूमीवर ते म्हणाले की, माझ्याकडे असलेले काही मुद्दे मी सार्वजनिक व्यासपीठावर नव्हे, तर पक्षनेतृत्वासमोर मांडणार आहे.

## बिबट्याच पिल्लू पुनामलनापूवाच दगावले

**▸विदर्भ केसरी। परतवाडा (अमरावती) :**

अमरावती प्रादेशिक वनविभागांतर्गत परतवाडा वनपरिक्षेत्रातील नागरवाडी येथे आढळून आलेले आणि आईपासून विभक्त बिबट्याचे पिल्लू पुनर्मिलनापूर्वीच दगावले चांदूर बाजार तालुक्यातील नागरताडी येथील सुहास रामकृष्ण वाघाडे यांच्या शेतात हे ब्रिबटचाचे पिल्लू आढळून आले होते. माहिती मिळताच परतवाड़ा वनपरिक्षेत्रांतर्गत वन कर्मचारी व अधिकाऱ्यांनी त्यास ताब्यात घेतले. सिपना वन्यजीठ विभाग परतवाडा अंतर्गत ट्रांजिस्ट ट्रीटमेंट सेंटर (टीटीसी) मध्ये पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडून त्या पिलाची वैद्यकीय तपासणी केली गेली. वैद्यकीय तपासणीनंतर राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आईपासून विभक्त झालेले पिल्लू आणि मादी बिबट यांच्या पुनर्मिलनाची कार्यवाही वन अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सनियंत्रणात सुरू करण्यात आली.

## आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**▸विदर्भ केसरी। वाशिम :**

शहरातील एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला धमकावत व ब्लॅकमेल करून तिच्याशी लग्न करण्याचा तगादा लावणाऱ्या आरोपीला वाशिम शहर पोलिसांनी अटक केली आहे. पीडित मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून आरोपी शे. शाहरुख शे. गफुर (वय ३५) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २४ जानेवारी रोजी रात्री सुमारे २





# अर्धी अमेरिका गारठली, हिमाचलात पाऊस, काश्मीरमध्ये पर्यटक अडकले

## १८ कोटी नागरिकांना फटका; ८ हजार उड्डाणे रद्द

■ वॉशिंग्टन : पश्चिमेकडील न्यू मेक्सिको ते पूर्वेकडील न्यू इंग्लंड असा लांबचा पल्ला गाठत आणि सुमारे डझनभर राज्यांना कवेत घेणारे विनाशकारी हिमवादळ अमेरिकेचर घोंगावत आले आहे. अमेरिकेच्या हवामान खात्याने म्हटले आहे की, या वादळाचा फटका १८ कोटीहून अधिक नागरिकांना बसेल. हे वादळ केवळ कडाक्याची थंडी नव्हे तर अत्यंत थंड तापमानाचा पाऊस व तुफान बर्फवृष्टी घेऊनही येत आहे.

## लाहौल, स्पिती गोठले; कुलू-मनालीत मुसळधार

■ सिमला: हिमाचल प्रदेशात शनिवारी काक्याची थंडी पडली होती. आदल्या दिवशीच्या ओरदार बर्फवृष्टीमुळे दोन राष्ट्रीय महामार्गासह ६८० हून अधिक रस्ते वाहतुकीसाठी बंद झाले आहेत. लाहील आणि स्थिती जिल्ह्यातील कुकुमसेरी येथे सर्वांत कमी उणे ७.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तुफान बर्फवृष्टीमुळे ५.७७५ ट्रान्सफॉर्मर्सना फटका बसला व त्यामुळे हजारो कुटुंबे अंधारात आहेत. असे तापमान २८ जानेवारीपर्यंत राहील. राज्यात मुसळधार पाऊसही पडू शकतो.

## जम्मू-श्रीनगर महामार्ग बंद, लष्कराकडून मदत

श्रीनगर: जम्मू-काश्मीरमध्ये शनिवारी दुसऱ्या दिवशीही बर्फवृष्टीने वाहतूक ठपा होती. काश्मीरला देशाच्या उर्वरित भागाशी जोडणारा २७० किमी लांबीच्या जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर शेकडो प्रवासी अडकून पडले होते. महामार्गाच्या रामबन सेक्टरमध्ये ९०० हून अधिक वाहने अडकली आहेत, तर जीवनावश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या ट्रकसह इतर २,००० हून अधिक चाहने जम्मू, उधमपुर, कुलगाम आणि अनंतनाग जिल्ह्यात यांबली आहे. लष्कर व प्रशासनाकडून मदतकार्य सुरू झाले आहे.

# सुमोची ट्रकला धडक : १२ मजूर जखमी

**▸विदर्भ केसरी। चिचाळा :**



चिमूर तालुक्यातील पेठ येथील महिला मजुरांना घेऊन जात असलेल्या सुमोने महामार्गावरील ट्रकला धडक दिल्याने सुमोतील ११ महिला व एक पुरुष असे १२ जण जखमी झाले आहेत. यात सहा जण गंभीर जखमी असून त्यांना चिमूर तालुक्यातील भिसी येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

शोभा अशोक पेंदाम (६०), अनिता विजय मेश्राम (३५), प्रिया बालाजी कुंभरे (३२), कल्पना राहुल चटपकार (३१), कविता घनश्याम बारसागडे (४५), रंजना गुलाब सहारे (४०), बेबी पेंदाम (६०), माया रामकृष्ण सावसाकडे (४२), सिंधू मनोहर पेंदाम (६०), रंजना जगदीश मेश्राम (४०), मंगला राजू मसराम (३६), राकेश रमेश धानोरकर (२८) अशी जखमींची नावे असून सर्व पिंपळनेरी-पेठ येथील रहिवासी आहेत. मिळालेल्या माहितीनुसार चिमूर तालुक्यातील पेठ येथील महिला मजूर एम. एच.२९-ए.डी.०३०७ क्रमांकाच्या सुमोने उमरेड तालुक्यातील आंबोली येथे मिरची तोडणी साठी गेले होते.

दरम्यान, गावाकडे जात असताना रात्री ७:३० सुमारास राष्ट्रीय महामार्ग ३५३-ई वरील मालेवाडा परिसरात टायर कंपनीजवळ ट्रक क्रमांक आर.जे.११-जी.बी.-०९३० ला धडक दिली. यात सुमोतील सर्व मजूर जखमी झाले. लागलीच गावकऱ्यांच्या मदतीने त्यांना चिमूर तालुक्यातील भिसी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच भितापूर पोलिस स्टेशनचे ठाणेदार जयप्रकाश निर्मल यांनी पोलिस पथकासह घटनास्थळ गाठले.

# चंद्रपूर काँग्रेसमधील वादावर तूर्तास तोडगा !

**▸विदर्भ केसरी। नागपूर :**

चंद्रपूर महानगरपालिकेतील सत्तास्थापनेवरून काँग्रेसमध्ये हालचालींना वेग आलाय. चंद्रपूरमध्ये काँग्रेसचाच महापौर होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत असून, सत्तास्थापनेसाठी लागणारी आकडेवारी खासदार प्रतिभा धानोरकर जुळवणार असल्याचे सांगितले जातंय. दरम्यान, चंद्रपूरमधील काँग्रेसमधील अंतर्गत वाद थेट दिल्ली दरबारी पोहोचला असून, प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

वडेट्टीवार म्हणाले, आज सकाळी झूम मीटिंग झाली. यात सगळे प्रभारी, प्रभारी सचिव होते. आमच्याकडे संख्याबळ २७आहे आणि मित्र पक्षाची तीन असे ३० संख्याबळ होते. सत्तास्थापनेसाठी आणखी चार नगरसेवकांची गरज आहे. याची जबाबदारी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी घेतली आहे. महापौरपदासाठी धानोरकर जे नाव देतील त्यांना महापौर करायचे निश्चित झाले आहे. यासोबतच गटनेतेपदाच्या नावावरही एकमत झाले आहे. प्रदेशाध्यक्षांनी नाव दिले आहे.

स्थायी समिती पाच वर्षे माझ्या बाजूने राहील, असे ठरले आहे. जे सोबत येणारे आहेत त्यांना उपमहापौरपद आणि स्थायी समितीमध्ये सदस्य पद द्यावे, अशी चर्चाही बैठकीत झाली. आता यासाठी लागणारे जे काही संख्याबळ आहे ते खासदार जुळवणार आहेत. महापालिकेत सत्तास्थापनेचा दावा काँग्रेसच्यावतीने केला जाईल, असेही त्यांनी सांगितले होते.

### नगरसेवकांना एक कोटीची ऑफर

■ **केंद्रात आणि राज्यात सत्ता भाजपकडे आहे. त्यांच्याकडे प्रचंड पैसा आहे त्यातून त्यांनी मोठमोठे ऑफर सगळ्यांना दिल्या आहेत. नगरसेवकांना एक कोटीची आणि पदाची ऑफर दिल्याची माहिती आहे, किती त्याला बळी पडणार आहे, आज सांगणे शक्य नाही. मात्र दुसऱ्यांची मदत घेतल्याशिवाय सत्ता स्थापन करता येणार नाही, हे चंद्रपुरातील वास्तव आहे.**

# पांढरकवड्यात गोवंश तस्करीवर मोठी कारवाई

**▸विदर्भ केसरी। पांढरकवडा**



पांढरकवडा : दिनांक २३ रोजी सकाळी सुमारे ७.०६ वाजताच्या सुमारास पांढरकवडा पोलीस स्टेशनच्या सतर्कतेमुळे गोवंश तस्करीचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. पांढरकवडा ते पाटणबोरी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर नियमित पेट्रोलिंग करीत असताना पोलीस कर्मचारी राम राठोड व गजानन पत्रे यांना गोपनीय माहिती मिळाली की नागपूरकडून एक ट्रकद्वारे गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी अदिलाबादकडे नेली जात आहेत. मिळालेल्या माहितीची खात्री करून पोलीसांनी तत्काळ दोन पंचांना बोलावले व पाटणबोरी येथील माहुली धाब्याजवळ सापळा रचला. यावेळी अतिरिक्त पोलीस मदतीसाठी पोलीस उपनिरीक्षक सचिन रघुपती व सरकारी वाहनचालक महेश धामणकर यांनाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले. काही वेळातच नागपूरकडून येणारा ट्रक क्रमांक MH 31 FC 4861 थांबवून पंचासमक्ष तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ट्रकमध्ये १९ बैल अत्यंत क्रूर व अमानुष पद्धतीने वाहतूक केल्याचे निदर्शनास आले. जनावरांच्या मानेस आकुड दोरी बांधून त्यांचे पाय घट्ट बांधण्यात आले होते, ज्यामुळे त्यांना तीव्र त्रास होत असल्याचे स्पष्ट दिसत होते. ट्रक चालकाकडे चौकशी केली असता त्याने आपले नाव सय्यद फारुख सय्यद रशिद वय ३६, रा. कामठी, नागपूर) असल्याचे सांगितले. तसेच ही जनावरे शेख मुक्तार शेख मुस्ताक कुरेशी वय ३६, रा. कामठी, नागपूर) यांच्या मालकीची असल्याचे निष्पन्न झाले. जनावरांच्या वाहतुकीसाठी आवश्यक असलेले कोणतेही परवाने, वाहतूक कागदपत्रे किंवा वैद्यकीय प्रमाणपत्र आरोपींकडे नसल्याचे पंचासमक्ष स्पष्ट झाले. या कारवाईत १९ बैलांची किंमत अंदाजे ₹३,०७,००० तर ट्रकची किंमत अंदाजे ₹२०,००,००० अशी एकूण ₹२३,०७,००० रुपयांचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी आरोपी चालक सय्यद फारुख सय्यद रशिद, जनावर मालक शेख मुक्तार शेख मुस्ताक कुरेशी व मदतनीस वैभव विनोद उके (वय ३१) यांच्याविरुद्ध अप.क्र. ६५/२६ अन्वये महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ सुधारित १९९५ प्राणी क्रूरता प्रतिबंधक अधिनियम १९६० तसेच मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. लहु तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल गजानन पत्रे करीत आहेत.

# बांगलादेश टी-20 वर्ल्डकपमधून बाहेर

## भारतात खेळण्यास दिला होता नकार; आयसीसीने त्यांच्याजागी स्कॉटलंडचा केला समावेश



■ **बांगलादेशात हिंदूंच्या सतत होत असलेल्या हत्यांच्या निषेधार्थ भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) बांगलादेशी वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमानला आयपीएलमधून बाहेर काढले. बीसीबीने याचा विरोध केला.**

■ **मुस्तफिजुरला बाहेर काढल्याच्या मुद्द्याला बांगलादेशातील राजकीय पक्षांनी मुद्दा बनवले. त्यानंतर युनूस सरकारने आपल्या देशात आयपीएल प्रसारणावर बंदी घातली. यानंतर क्रिकेट बोर्डाने भारतात विश्वचषक न खेळण्याची मागणी केली, जी आयसीसीने फेटाळून लावली.**

**▸विदर्भ केसरी।**

बांगलादेश टी-20 विश्वचषकातून बाहेर पडला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) त्याच्या जागी स्कॉटलंडचा समावेश केला आहे. दुबईत झालेल्या बैठकीदरम्यान, आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी हा निर्णय घेतला. आयसीसीने आपल्या सोशल मीडिया हँडलवर ही माहिती दिली. गुरुवारी आयसीसीने दिलेल्या २४ तासांच्या मुदतीनंतरही बांगलादेश सरकारने भारतात खेळण्यास नकार दिल्याने, आयसीसीने हे पाऊल उचलले.

भारतात सामने आयोजित करण्याच्या आयसीसीच्या निर्णयाविरोधात बांगलादेश क्रिकेट बोर्डाने (BCB) वाद निवारण समितीकडे (DRC) अपील दाखल केले होते, परंतु तेही फेटाळण्यात आले.

या संपूर्ण वादाची सुरुवात बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमानला आयपीएलमधून बाहेर काढल्यानंतर झाली. यानंतर बीसीबीने भारतात खेळणे असुरक्षित असल्याचे सांगत संघाला भारतात पाठवण्यास नकार दिला. बांगलादेश सरकारचे क्रीडा सल्लागार आसिफ नझरुल यांनी गुरुवारी ढाका येथे राष्ट्रीय संघाच्या खेळाडूंसोबत बैठक घेतली. बैठकीनंतर ते म्हणाले, 'आम्हाला वर्ल्ड कप खेळायचा आहे, पण भारतातील आमच्या खेळाडूंच्या आणि सपोर्ट स्टाफच्या सुरक्षेबाबतची चिंता अजूनही कायम आहे.

# तोंगलाबाद येथे २८ जानेवारीला भव्य यात्रा महोत्सव

## २६ जानेवारीला "प्रति इंदोरीकर" गंगाराम महाराज राऊत यांचे विनोदी कीर्तन तर २७ जानेवारीला लोकशाहीर श्याम वानखडे यांचा "लोकजागर" कार्यक्रम

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर (ता. प्रतिनिधी)**






-तालुक्यातील तोंगलाबाद येथे ग्रामदैवत श्री संत हनुमान महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त दिनांक २० जानेवारी पासून सुरू झालेल्या ग्रामदैवत संत हनुमान महाराज पुण्यतिथी उत्सवाची सांगता २८ जानेवारी रोजी होणार असून सकाळी ९ वाजता काल्याचे कीर्तन व ११ वाजता गावातून श्रींची पालखी मिरवणूक निघणार आहे.

यामध्ये ९५ हजार रुपयांचे बक्षिसे असणारी साप्रदायिक दिंडी स्पर्धा संपन्न होणार आहे. यामध्ये प्रथम बक्षीस २१ हजार,द्वितीय बक्षीस १६ हजार, तृतीय बक्षीस १२ हजार, चतुर्थ बक्षीस १० हजार, पाचवे बक्षीस ८ हजार, सहावे बक्षीस ६ हजार, सातवे बक्षीस ५ हजार पाचशे,आठवे बक्षीस ५ हजार, नववे बक्षीस ३ हजार पाचवे रूपये राहणार आहेत, तसेच उत्कृष्ट मृदुंगचार्य २ हजार, उत्कृष्ट गायनाचार्य २ हजार, उत्कृष्ट पेहराव १ हजार सहाशे,उत्कृष्ट विणेकरी १ हजार पाचशे रूपये बक्षीस असणार आहे, तसेच बक्षीस न मिळणाऱ्या दिंडीला ३ हजार रूपये मानधन देण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी ४ वाजता दहीहंडी व बक्षीस वितरण सोहळा व दुपारी ५ वाजता महाप्रसाद संपन्न होणार आहे तर संध्याकाळी ७ वाजता लाखो रुपयांची भेटवस्तु असणारा लकी ड्रॉ सोडत निघणार असून संध्याकाळी ७ वाजता वऱ्हाडी हास्यकवी संमेलन आयोजित करण्यात केले आहे. ॲड अनंत खेडकर, नरेंद्र इंगळे, विजय पाटील, नितीन वरनकर, विलास ठोसर,दिनेश मोडोकार, रवींद्र महले,रणजीत गणोदे आदी कविवर्य सहभागी होणार आहे. कीर्तन सोहळा साजरा होणार आहे.त्याआधी दिनांक २६ जानेवारी रोजी संध्याकाळी ७ वाजता विनोदी कीर्तनकार, "प्रति इंदोरीकर" ह.भ.प.गंगाराम महाराज राऊत(श्रीक्षेत्र पैठण) यांचा कीर्तन सोहळा साजरा होणार आहे.तर दिनांक २७ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता होमहवन व संध्याकाळी ७ वाजता लोकशाहीर श्री श्याम वानखडे(वाशिम) यांचा समाजप्रबोधन लोकजागर हा पंचरंगी कार्यक्रम होणार आहे. तरी भव्य यात्रा महोत्सवाचा सर्व भाविक भक्तांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन श्री संत हनुमान महाराज संस्थान व युवा यात्रा महोत्सव समिती आणि गावकरी मंडळी यांनी केले आहे.

# पावणे एमआयडीसीत अग्नितांडव; ६ कंपन्या खाक

**▸विदर्भ केसरी। नवी मुंबई:**



पावणे एमआयडीसीमधील केमिकल कंपनीला शनिवारी दुपारी भीषण आग लागली. या आगीत सहा कंपन्या खाक झाल्या. यावेळी झालेल्या स्फोटांमुळे परिसर हादरला असून, अनेक सिलिंडर हवेत उडाले. त्यात कोट्धर्तींचे नुकसान झाले आहे. या दुर्घटनेत जीवितहानी झाली नसून, आगीच्या कारणाचाही उलगडा झालेला नाही,

पावणे एमआयडीसीमधील बिटा केमिकल या कंपनीत दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास आग लागली. कंपनीत वापरात असलेल्या केमिकलचा हाताळणी करताना आग लागल्याची शक्यता वर्तितिली जात आहे.

आग आटोक्यात येत नसल्याचे लक्षात येताच कामगारांनी कंपनीबाहेर पळ काढला. कंपनीतील केमिकलच्या साठ्याने पेट घेतल्याने त्याचा साठा असलेले ड्रमचे एकामागून एक स्फोट होत होते. त्यामुळे ही आग बाजूच्या इतरही कंपनीत पसरत गेली.

त्यामध्ये काही वेळातच रायगड केमिकल्स, नॅशनल रबर, क्वालिटी, वेल केमिकल्स या कंपन्याही आगीच्या कचाट्यात सापडल्या. सर्वच कंपनीत केमिकल असल्याने त्याच्या साठ्याचे छोटे-मोठे स्फोट होत होते. त्यातून निघणाऱ्या धुराचे लोट परिसरावर पसरले होते.

दैनिक
विदर्भाचा मानबिंदू
विदर्भ केसरी



## अग्रलेख

# विदर्भाचे राजकारण

महापालिकांच्या सत्तास्थापनावरून विदर्भात राजकीय हालचालींना वेग आला असून, महापौरपदासाठी अंतर्गत संघर्ष, नाराजी आणि धक्कातंत्र सुरू आहे. आठवडाभरात अनेक वर्षांचे प्रशासकराज संपुष्टात येऊन विदर्भातील चारही महापालिकांवर 'नवा गडी नवे राज्य' सुरू होईल. राज्यातील 29 पैकी 15 शहरांमध्ये महिला महापौर विराजमान होणार आहेत. यात विदर्भातील नागपूर, अकोला, चंद्रपूर या ठिकाणी तीन महिला महापौर असणार आहेत. अमरावती येथे खुले आरक्षण जाहीर होताच इच्छुकांची मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 25 जानेवारीला नागपुरात येतील त्यावेळी त्यांच्यापुढे दोन प्रश्न असतील. त्यांचे निकटवर्ती जिवलग मित्र आमदार संदीप जोशी यांनी टर्म संपण्यापूर्वी घेतलेला राजकीय संन्यासाचा निर्णय, दोन दिवस कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांचे शक्तिप्रदर्शन... यावरून तो निर्णय कायम ठेवायचा की रद्दबातल करायचा आणि दुसरे म्हणजे नागपूरच्या महापौरपदी कोण? मुख्यमंत्र्यांच्या निकटवर्तीय पक्ष संघटनेत कार्यरत शिवानी दानी यांचे नाव महापौरपदासाठी आघाडीवर आहे. नीता ठाकरे, अश्विनी जिचकार, दिव्या धुरडे, मंगला खेकरे अशी इतरही नावे आहेत. शिवानी दानी यांच्या नावावर शिक्कामोर्तब होणार की, 105 नगरसेवकांना नारळ देणारा भाजप धक्कातंत्र अवलंबणार हे लवकरच स्पष्ट होईल. मनपा निवडणुकीत निष्ठावंतांना तिकीट न मिळाल्याने संदीप जोशी नाराज झाल्याचे बोलले जाते. महापौर, आमदार अशी महत्त्वाची पदे मिळूनही ते नाराज आहेत तर साधे नगरसेवकपदाचे तिकीट न मिळालेल्या निष्ठावंतांचे काय? स्वतः नितीन गडकरी यांनी याबाबतीत अनेकदा चिमटे काढले आहेत. नागपुरात 15 वर्षांची सत्ता कायम ठेवणाऱ्या भाजपला 120 सदस्यसंख्या गाठता आली नाही तरी सत्तेचा दिलासा मिळाला. चंद्रपूर, अकोला येथे काँग्रेसचा महापौर बसू शकतो. एमआयएम, मुस्लिम लीगची अनपेक्षित मुसंडी सत्तेचे गणित काही अंशी बिघडविणारी ठरली. अमरावतीत महायुतीला सत्ता समोर दिसत असताना राणा-खोडके दाम्पत्याची जिल्ह्यातील वर्चस्वाची लढाई अडचणीची ठरत आहे. चंद्रपूरचा वाद नेते, त्यांचे नगरसेवक हॉटेलात मुक्कामी असल्याने नागपुरात पोहोचला आहे. शिवसेना उबाठाचे सहा नगरसेवक भाजप की काँग्रेसकडे यावर सध्या खल सुरू आहे. गटनेते विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील वादात थेट प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि अखिल भारतीय काँग्रेसचे सचिव सहप्रभारी कुणाल चौधरी यांना मध्यस्थी करावी लागली. लवकरच तोडगा निघून काँग्रेसचा महापौर बसेल, असा दावा केला जात आहे. माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि आमदार किशोर जोरगेवार यांनी 'तुझे माझे जमेना, तुझ्यावाचून करमेना' शैलीत भाजपचा महापौर होईल आणि काँग्रेसचे नगरसेवक संपर्कात असल्याचा दावा केला. काँग्रेसचा महापौर बसल्यास भाजपला नगरपालिकेपाठोपाठ मोठा धक्का बसेल. मंत्रिपद न दिल्याने मुनगंटीवार यांची नाराजी पक्षाचे आणखी किती नुकसान करणार हे येणारा काळच सांगेल. अकोल्यामध्ये 41 सदस्यांच्या मॅजिक फिगरपासून भाजप तीन सदस्य दूर आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या निवासस्थानी एमआयएम, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार, अपक्ष नगरसेवकांची बैठक झाली. काँग्रेसचे 21 नगरसेवक आहेत. भाजपला दूर ठेवण्याचे लक्ष्य आमदार साजिद खान पठाण यांनी ठेवले असले तरी उबाठा शिवसेनेचे नॉट रिचेबल 6 सदस्य, माजी गृह राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील यांचे पुतणे भाजप बंडखोर आशिष पवित्रकार यांची तळ्यात-मळ्यात भूमिका हा तिढा अधिक वाढवत आहे. ध्वनी प्रदूषणाबाबत जनहित याचिकेवर उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने विदर्भातील सर्व जिल्हाधिकारी, मनपा, न.प. आयुक्त, पोलिस आयुक्त व पोलिस अधीक्षकांसह अन्य प्रतिवाद्यांना नोटीस बजावून दोन आठवड्यात सविस्तर उत्तर मागवले आहे. दुसरीकडे खापरखेडा औष्णिक वीज प्रकल्पातून होत असलेल्या प्रदूषणावरील जनहित याचिकेची नागपूर खंडपीठाने गंभीर दखल घेतली. न्यायालयाने ऊर्जा सचिवांसह इतर प्रतिवाद्यांना दोन आठवड्यांत उत्तर मागितले आहे. एकंदरीत एकीकडे मोठी गुंतवणूक, पायाभूत सुविधा, औद्योगिक विकासाचे, विदर्भ समृद्धीच्या वाटेवर असल्याचे गोडवे गायले जात असताना विदर्भाची बदलती हवा चिंता वाढविणारी म्हणता येईल.

# न्यायासाठी भव्य कॅण्डल मार्च

## अनुष्का पाटोळेवरील अन्यायाविरोधात सकल मातंग समाज व आधारस्तंभ फाउंडेशनने नोंदविला निषेध

**विदर्भ केसरी। यवतमाळ |**

"अन्याय करणाऱ्यांपेक्षा अन्याय सहन करणारा अधिक गुन्हेगार असतो. मात्र आता मातंग समाज अन्याय सहन करणार नाही. हा समाज पूर्वी सर्वच क्षेत्रात अग्रेसर होता. काही काळ मागे पडला असला तरी आता संघटित होऊन संघर्षाच्या मार्गावर आहे. मातंग समाज आता कधीही मागे पडणार नाही," असे ठाम प्रतिपादन बाळासाहेब गावंडे यांनी केले.

ते संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळून निघालेल्या भव्य कॅण्डल मार्च प्रसंगी बोलत होते. हा कॅण्डल मार्च सकल मातंग समाज, यवतमाळ जिल्हा व आधारस्तंभ फाउंडेशन, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. अनुष्का पाटोळे हिच्यावर झालेल्या अन्यायाच्या निषेधार्थ हा शांततामय मोर्चा काढण्यात आला.

**■ जागृतीचे आवाहन, समाजमनाचे प्रबोधन**

कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत सामाजिक अन्याय, अत्याचार व भेदभावाविरोधात जनजागृतीचे आवाहन केले.

सुनीता काळे म्हणाल्या, "मुक्ता साळवे यांनी 'आम्ही धर्म नसलेली लोक आहोत' असे सांगितले होते. मातंग समाजावर सातत्याने अन्याय होत आहेत. त्यामुळे आता जागृत होणे अत्यावश्यक आहे. जसे घरात संविधान उपदेशिका ठेवतो, तसेच मुक्ता साळवे यांचा निबंधही प्रत्येक घरात असला पाहिजे."

प्रा. संजय वानखडे, प्रा. वाघमारे, विलास काळे सर, माजी तहसीलदार माणिकराव खडसे, शेतकरी नेते पडघन, गोविंदराव वानखडे, युवा नेते योगेश धानोरकर आदी मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त करत सामाजिक न्यायासाठी एकजुटीचा संदेश दिला.

**■ "न्याय मिळेपर्यंत संघर्ष थांबणार नाही" – पल्लवी इंगोले**

आधारस्तंभ फाउंडेशनच्या संयोजिका पल्लवी इंगोले म्हणाल्या, "अनुष्का पाटोळे एक जरी गेली असली, तरी तिच्या न्यायासाठी लाखो अनुष्का रस्त्यावर उतरतील.



न्याय मिळाल्याशिवाय आम्ही मागे हटणार नाही. हा लढा थांबणार नाही."कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजाभाऊ इंगोले यांनी केले, तर भुराजी तायडे यांनी आभार प्रदर्शन केले.

**■ शेकडोंचा सहभाग, शांततेतून रोष व्यक्त**




या कॅण्डल मार्चमध्ये शेकडोच्या संख्येने महिला, पुरुष, शालेय विद्यार्थी, समाजसेवक सहभागी झाले होते. विशेषतः महिलांचा सहभाग लक्षणीय ठरला.

सहभागी प्रमुख कार्यकर्ते व नागरिक :मनोज रणखाम, पंडित वानखडे, संजय कांबळे, प्रा. यशवंत खंडारे, ज्ञानेश्वर खंडारे,अजय यंगड, सागर झोंबाडे, सागर कळणे, मेजर सचिन खंडारे,अमोल पडघन, अनिल इंगोले, सुनील हिवराळे, विना नागदिवे , प्रा.संजय नाटकर, जीवन वाघमारे, प्रफुल गवळी, सचिन लोंढे,करण केराम, सुरज लोंढे, वैशाली ससाणे, मंदा इंगोले, नीलेश इंगोले, वृषाली इंगोले,राजू गवळी, रेखा लोंढे, हेमा यंगड, संगीता यंगड आदींसह अनेक सामाजिक कार्यकर्ते, तसेच वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संविधान चौक ते शिवतीर्थपर्यंत शांततामय मार्च

हा कॅण्डल मार्च संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून सुरू होऊन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, शिवतीर्थ येथे शांततेत समारोप झाला.

कॅण्डल मार्चच्या माध्यमातून समाजाने अन्यायाविरोधात आपला रोष शांततेत व्यक्त करत न्याय, समता आणि संविधान मूल्यांच्या रक्षणाचा संकल्प केला.

# हे किळसवाणे कोठून येते ?

विनयभंग प्रकरणाने बदलापूर गुरुवारी पुन्हा एकदा हादरलं. बेकायदेशीर शाळेच्या महिला सहाय्यक नसलेल्या व्हॅनमध्ये एका चिमुकलीचा विनयभंग झाला.



साधारण दीड वर्षांत घडलेल्या दुसऱ्या विनयभंग प्रकरणाने बदलापूर गुरुवारी पुन्हा एकदा हादरलं. या प्रकराची माहिती बातम्यांमध्ये काल आल्याने संपूर्ण महाराष्ट्रात अस्वस्थता पसरली. बदलापूरमध्ये साधारण वर्ष - सव्वा वर्षापूर्वी शाळकरी मुलीच्या विनयभंगाचा दुर्दैवी प्रकार घडला होता. शाळेतल्या शिपायाकडूनच विनयभंगाचा प्रकार झाल्याने आणि शाळा प्रतिष्ठित, ख्यातनाम असल्याने पोलिसांनी गुन्हा नोंदवण्यास हयगय चालवली, तेव्हां बदलापूरकरांनी मोठ्या संख्येने रेल्वे रुळावर उतरून आपल्या भावनांना वाट करून दिली होती. त्या उद्रेकाने सगळ्या यंत्रणा वठणीवर आल्या होत्या. त्या विनयभंग प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेनंतर पोलिसांच्या गाडीत झालेल्या चकमकीत मारला गेला. त्या संपूर्ण प्रकरणाची आठवण महाराष्ट्राला काल पुन्हा एकदा झाली. गेल्या प्रकरणात शाळकरी मुलगी होती. यावेळी पूर्वप्राथमिक शाळेत, म्हणजे बालवाडीत जाणारी अवघी चार वर्षांची चिमुकली आहे. गेल्यावेळी शाळेतला शिपाई होता; यावेळी मुलांची शाळेत ने-आण करणाऱ्या खासगी व्हॅनचा चालक आहे. म्हणजे, ज्यांची व्यवस्था मुलांच्या सहाय्यासाठी आणि संरक्षणासाठी केली आहे, तेच दोन्ही प्रकरणात आरोपी आहेत! अशावेळी विश्वास कोणावर ठेवायचा, असा प्रश्न हतबल पालकांसमोर उभा ठाकल्याशिवाय राहात नाही. दोन्ही घटना बदलापुरात घडल्याने हा प्रश्न केवळ बदलापूरपुरता सीमित आहे, असा गैरसमज करून घेण्याचं कारण नाही. याची व्याप्ती पूर्ण देशभर आहे. महाराष्ट्राने; निदान महाराष्ट्राच्या शिक्षण मंत्र्यांनी आणि पोलीस महासंचालकांनी तरी याची गंभीर दखल घेतली पाहिजे. अशा घटना घडू नयेत यासाठी कडक प्रतिबंधात्मक व्यवस्था केली पाहिजे. महाराष्ट्रातल्या महानगरी, शहरी, निमशहरी, ग्रामीण-अशा सर्व ठिकाणी समान पद्धतीने लागू करता येईल, अशीच ही उपाययोजना असायला हवी. बदलापूरला आता महिला नगराध्यक्ष असल्याने त्यांनी स्थानिक पातळीवर या प्रश्नाच्या खोलात जाऊन संबंधित यंत्रणांना उपाययोजनांसाठी मदतही केली पाहिजे. कारण, या शहराची इभ्रत राखण्याची सगळ्यात पहिली जबाबदारी त्यांची आहे!

बदलापुरात अगदी कमी अंतराने दोन घटना घडल्या आणि पहिल्या प्रकरणात पोलिसांनी सुरुवातीला गहाळपणा केला, अन्यथा बदलापूरचं नांव एवढं चर्चेत येण्याचं काही कारण नव्हतं. अशाच घटना यापूर्वी मुंबईत, उच्चभ्रूंच्या मानल्या जाणाऱ्या शाळेतही घडल्या आहेत. त्या प्रकारानंतर शाळेच्या बस आणि शाळेने नेमलेल्या खासगी कंत्राटदारांच्या बस याबाबत बरीच चर्चा झाली होती. विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या अशा बसमध्ये एक महिला सहाय्यक असावी, मुलांना बसमध्ये घेण्याची आणि शाळा सुटल्यानंतर त्यांना बसमधून पुन्हा पालकांच्या स्वाधीन करण्याची जबाबदारी या महिला सहाय्यकावर सोपवावी, असा तोडगा निघाला होता. त्याची अंमलबजावणीही झाली होती. मुंबईत घडलेल्या त्या घटनेचे पडसाद इतके तीव्र होते, की बसच काय; मुलांची शाळेसाठी वाहतूक करणाऱ्या व्हॅनमध्येही महिला सहाय्यकांची नेमणूक करण्यात आली होती. पण, नंतर आपल्याकडे जे घडतं, तेच झालं. काळ लोटला. प्रकरणाचं गांभीर्य कमी झालं. नवं शालेय वर्ष सुरू झालं. व्हॅनमधल्या महिला सहाय्यक गायब झाल्या आणि परवाचा प्रकार घडला! या बालिकांच्याबाबतच नाही, जगात कुठेही महिलांच्या विनयभंगाचे प्रकार घडले, अत्याचाराच्या घटना घडल्या, तर त्यातल्या बहुतांश घटनांमध्ये पुरुष नातेवाईक किंवा परिचितांपैकीच कोणीतरी आरोपी असतात, अशी सिद्ध झालेली आकडेवारी आहे. बदलापूरच्या पूर्वीच्या घटनेतला आरोपी शाळेचा शिपाई होता. परवा घडलेल्या आणि मुंबईतल्याही अलीकडच्या घटनेतले आरोपी विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी असलेल्या गाड्यांचे चालक होते. परवाच्या घटनेच्या तपशिलात पाहिलं, तर व्हॅन नेहमी बालिकेला घेऊन ज्या वेळेला येते, त्यापेक्षा बराच उशीर झाल्याने पालकांनी चौकशी केली, तेव्हा त्यानंतर पाऊण तासाने व्हॅन पोहोचली. परतलेल्या बालिकेचं वर्तन पालकांना खटकल्याने त्यांनी जेव्हा खोदून खोदून चौकशी केली, तेव्हा आक्षेपार्ह प्रकार उघडकीस आला. चालकाला शाळेत बोलावलं, तेव्हा बालिका घाबरून पालकांमागे लपली. झाल्या प्रकाराला त्यातून दुजोरा मिळाला, असं समजतं. हा संपूर्ण प्रकारच अत्यंत किळसवाणा आहे. इतक्या छोट्या मुलींचा विनयभंग होईल, असं दुष्कृत्य करावंसं संबंधित पुरुषांना का वाटत असेल? त्यांच्या मनात असं अभद्र कशातून उगवत असेल? शिक्षण क्षेत्रातले तज्ज्ञ या प्रकारांसाठी पहिले दोषी ठरवतात, ते मोबाईलमधून २४ तास स्त्रवत असलेल्या हिंसक, लैंगिक, भावना उद्दीपित करणाऱ्या 'मनोरंजना'च्या तथाकथित कार्यक्रमांना. या कार्यक्रमांतून; छोट्या छोट्या रीलमधूनही जे पोहोचतं, त्यातून अशा आक्षेपार्ह बाबींबाबतचं गांभीर्य, धाक संपून जातो. नैतिकतेचे सारे संस्कार गळून पडतात. असा एखादा कार्यक्रम किंवा रील पाहिल्या, तरी तुमच्या मोबाईलवर त्याच प्रकारचे कार्यक्रम, रील किंवा मनोरंजनाच्या तत्सम प्रकारांची रांग लागते. पाहणारा एकामागून एकात गुंतत जातो. त्यातून सगळं जग अशा विकृत प्रकारांनीच भरलं असल्याचा भास त्याला होतो. जे 'खासकरून' बनवलेलं असतं, तेच त्याला 'सर्वसाधारण' वाटू लागतं. त्यातून हे प्रकार वाढीस लागतात. साहजिकच प्रौढांपेक्षा तरुणांमध्ये, कुटुंबापासून लांब असलेल्या किंवा निवासाच्या अपुऱ्या सोयी असलेल्यांमध्ये हे प्रकार अधिक आहेत. बदलापूरमध्ये घडलेल्या दुर्घटना उघडकीस आल्या, त्याची दखल पालकांनी घेतली, प्रकरण पोलिसांपर्यंत नेण्याचा आग्रह धरला म्हणून; अन्यथा मुंबई आणि मुंबईलगत पसरलेल्या अक्राळविक्राळ वस्त्यांचा नुसता अंदाज घेतला, तरी त्यात असे असंख्य प्रकार आढळतील. अगदी लहान मुलांमध्ये (केवळ मुलींनानव्हे!), शाळेच्या शिक्षकवृंदासह सर्व कर्मचाऱ्यांमध्ये, सहाय्यक ज्या स्तरातून येतात, त्या स्तरांमध्ये आणि महत्त्वाचं म्हणजे, पोलिसांमध्ये मुली-महिलांवरील अशा विनयभंग, जोर-जबरदस्तीच्या प्रकरणांबाबतची संवेदनशीलता वाढवली पाहिजे. अशी संवेदनशीलता वाढवणं, ही जागृतीनंतरची पुढची पायरी आहे. समाजमाध्यमांतून वाहत असलेल्या, अतिरंजित, विकृत 'मनोरंजना'चं काय करायचं, हा जगातल्या सगळ्याच सरकार आणि समाजधुरिणांसमोरचा प्रश्न आहे. हा 'जागतिक प्रश्न' जेवढ्या लवकर सुटेल, तेवढे पुनःपुन्हा 'बदलापूर' होण्यापासून वाचेल!

# वारंवार शारीरिक संबंध अन् मुलाचा जन्म हे लग्नासारखेच नातेः मुंबई हायकोर्टाचा लिव्ह इनवर निर्वाळा

**विदर्भ केसरी।**

मुंबई उच्च न्यायालयाने एका प्रकरणात सुनावणी करताना वारंवारचे शारीरिक संबंध आणि मुलांचा जन्म हे लग्नासारखेच नाते असल्याचा महत्त्वपूर्ण निर्वाळा दिला. कोर्टाने या प्रकरणी एका पुरुषाच्या जोडीदाराने त्याच्याविरोधात दाखल केलेला खटला रद्दबातल करण्यास नकार दिला. तसेच महिला जोडीदाराला पत्नीचा, तर नातेसंबंधांतून जन्मलेल्या मुलीला मुलीचा दर्जा दिला. वारंवार लैंगिक संबंध व मुलाचा जन्म यासह दीर्घकालीन घनिष्ठ संबंध हे महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण कायद्यांतर्गत विवाहाच्या समतुल्य मानले जाऊ शकतात, असे कोर्टाने या प्रकरणी नमूद केले.

प्रस्तुत प्रकरणात आरोपी व त्याच्या कुटुंबाने चामोर्शीच्या प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकाऱ्यांपुढे प्रलंबित असलेल्या कार्यवाहीला आव्हान देणारी याचिका दाखल केली होती. त्यांनी 2022 व 2023 मध्ये त्याच्या जोडीदाराला व त्याच्या अल्पवयीन मुलीला देखभाल भत्ता देण्याचे आदेश रद्द करण्याचीही मागणी केली होती. या प्रकरणात एका 22 वर्षीय तरुणीने आपल्या प्रियकराविरोधात घरगुती हिंसाचार कायद्यांतर्गत खटला दाखल केला होता. न्यायमूर्ती एम एम नेर्लीकर यांनी या प्रकरणी सुनावणी करताना आरोपीविरोधातील खटला रद्द करण्यास नकार दिला. तथापि, आरोपीचे पालक व पत्नीला या प्रकरणातून वगळून त्यांना दिलासा दिला.

**■ महिलेचा काय होता युक्तिवाद?**

महिलेच्या म्हणण्यानुसार, तिचे आरोपीसोबत प्रेमसंबंध होते. दोघे अनेकदा भेटले. त्यांच्यात अनेकदा शारीरिक संबंधही प्रस्थापित झाले. या काळात ती गरोदर राहिली. आरोपीच्या आग्रहाखातर तिने एकदा गर्भपात केला. त्यानंतरही त्यांचे संबंध चालू राहिले. त्यात ती पुन्हा गरोदर राहिली. पण यावेळी तिने गर्भपात करण्यास नकार दिला. तिच्या जोडीदाराच्या आग्रहावरूनीह तिने गर्भपात केला नाही. त्यानंतर त्यांना एक गोंडस मुलगी झाली. आई झाल्यानंतर महिलेने आपल्या प्रियकराकडे लग्नाचा तगादा लावला. पण त्याने नकार दिला.

एवढेच नाही तर महिलेशी असणारे संबंध व एका मुलीचा बाप असूनही त्याने 2022 मध्ये दुसऱ्या एका महिलेशी लग्न केले. यामुळे संतापलेल्या महिलेने 7 मे 2022 रोजी विविध कायद्यांतर्गत आरोपीविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल केला.

**■ आरोपीच्या वकिलांनी काय केला युक्तिवाद?**

या खटल्याच्या सुनावणीत आरोपीच्या वकिलाने हायकोर्टात युक्तिवाद केला की, केवळ आठवड्याचे शेवटचे दिवस एकत्र घालवणे किंवा वन - नाईट स्टँड असणे हे घरगुती संबंध ठरत नाहीत. त्यांनी असा आग्रह धरला की, ही तक्रार केवळ सूड उगवण्यासाठी दाखल केली होती. त्यामुळे ती फेटाळून लावली पाहिजे. मॅजिस्ट्रेट कोर्टाने तिला दरमहा 5 हजार व तिच्या मुलीसाठी 2 हजार अंतरिम देखभालीचा आदेश दिला आहे. पण या प्रकरणी अंतिम कारवाई पूर्ण होईपर्यंत व पुरावे सादर होईपर्यंत आरोपीच्या सध्याच्या याचिकेवर विचार करू नये. या सर्व संबंधांना घरगुती हिंसाचार कायद्याच्या अर्थाच्या आत आणण्यासाठी घरगुती संबंधांच्या व्याख्येचा उदार अर्थ लावणे आवश्यक आहे.

**■ महिला व पुरुषात लग्नासारखेच नाते होते**

कोर्टाने हा युक्तिवाद ऐकल्यानंतर पुरुषाचे त्यानंतर झालेले लग्न हे सुरुवातीच्या टप्प्यात घरगुती हिंसाचार कायद्यांतर्गत महिलेला संरक्षण नाकारण्याचे कारण असू शकत नाही असे स्पष्ट केले. कोर्ट म्हणाले, सुप्रीम कोर्टाच्या निकालांवर अधीन राहून कोर्टाने असे मानले की, नातेसंबंधांचा कालावधी, लैंगिक संबंधांचे स्वरुप व मुलांची उपस्थिती हे वैवाहिक नातेसंबंधाचे मजबूत निदर्शक आहे. दीर्घकाळ सहवास, लैंगिक संबंध, जबरदस्तीने गर्भपात व त्यानंतर मुलीच्या जन्माबाब महिलेचे विधान सकृतदर्शनी घरगुती संबंध व लग्नासारख्याच नात्याच्या कक्षेत येते. त्यामुळे घरगुती हिंसाचार कायद्याच्या कलम 2 (फ) अंतर्गत असे मानले जाऊ शकते की याचिकाकर्ता व त्याच्या जोडीदाराचे लग्नासारखेच नाते होते. कारण, ते बराच काळ एका नात्यात होते. या नात्यातून एका मुलीचा जन्म झाला. त्यामुळे त्यांचे संबंध लग्नासारखेच होते हे स्पष्ट होते, असे कोर्ट म्हणाले.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## नेर येथे डेंटल कार्यशाळा

नेर : यवतमाळ डेंटल असोसिएशन तर्फे २१ जानेवारीला दंत कार्यशाळेचे आयोजन विश्राम गृह येथे करण्यात आले होते. यावेळी डॉक्टर प्रशांत तामगाडगे हे अध्यक्षस्थानी होते. डॉ. श्याम गाढवे आणि डॉ. अंकुश सुने यांनी डेंटल विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. वैभव आगरकर यांनी सोसिअल सेक्युरिटीवर मार्गदर्शन केले. दारव्हा, नेर, अमरावती येथून बऱ्याच डॉक्टरांनी उपस्थिती दर्शवली होती. डॉ. अनुरूप मासाळ आणि डॉ. रुपेश पचगडे यांनी प्रोजेक्ट कार्यशाळेसाठी परिश्रम घेतले. डॉ. मनीष मोहोड आणि डॉ. अक्षय जाधव यांनी सहकार्य केले.

### महत्त्वाचे

## सुपुनाथ महाराज यात्रा संम्पन्न

▸विदर्भ केसरी। तालुका प्रतिनिधी अरविंद चौधरी



घाटंजी तालुक्यातील मुर्ली येथे गेल्या तीन पिढ्या पासून यात्रा भरत असते तालुक्यातील च नव्हे तर यवतमाळ जिल्यातील अनेक भाविक भक्त या यात्रे करीता येतात तीन दिवस ही यात्रा चालते यावर्षी दी, 25-26-आनी 27जानेवारी ला आहे 25ला सकाळी देव आंघोळी ला जाऊन पालकी पूजन करतात व 26जानेवारी ला सायंकाळी रहाड व महाप्रसाद असते याचे वैशिष्ठ म्हणजे मंदिराचे पुजारी श्री सुदर्शन शिंदे मामा लखलखत्या अग्नितुन पुजारी पालकी घेऊन अनेक भक्तसह सोबत घेऊन निगतात सर्व गावातील च लोक वर्गणी करुन महाप्रसाद चा कार्यक्रम पार पाडतात 27जानेवारी ला श्याट आनी दहीहंडी चा कार्यक्रम असते पंचकृषित नावलौकिक असलेली ही यात्रा आहे सर्व गावचे श्रद्धास्थान असलेले सुपुनाथ मंदिर सर्व गाव मोठ्या उत्साहाणे श्रद्धाठेऊन नेकीने हा उत्सव साजरा करते
या मंदिराचे पुजारी सुदर्शन किसनमामा शिंदे असून सोबत सर्व गावकरी यात भाग घेत असते

## नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती व वसंत पंचमी साजरी

▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते



युवक मंडळ पुसद द्वारा संचालित स्थानिक मातोश्री पार्वतीबाई नाईक कॉन्व्हेंट शाळेमध्ये आज दिनांक 23/01/2026 रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती व वसंत पंचमी साजरी करण्यात आली. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. बी.एन. खराटे सर यांच्या शुभहस्ते माता सरस्वती व नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी शाळेतील समस्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंदांनी पुष्प अर्पण करून माता सरस्वती व नेताजी सुभाषचंद्र बोस यांना अभिवादन केले. यावेळी सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका सौ. प्रिती पोळकट यांनी केले तर शिक्षिका सौ. दिपीका खराटे यांनी माता सरस्वती व नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. तर शाळेतील शिक्षक श्री. नितीन नांदेडकर यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## मुर्धोनी, नेरड ग्रामस्थांचे उपोषण मागे

▸विदर्भ केसरी। वणी

तालुक्यातील मुर्धोनी व नेरड ग्रामपंचायतीमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गावकऱ्यांचा आरोप आहे. अनेकदा प्रशासनाकडे तक्रार करुनही याची चौकशी केली जात नाही. त्यामुळे या दोन्ही गावातील गावकऱ्यांनी तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरु करुन चौकशीची मागणी केली आहे. दरम्यान, शुक्रवारी आश्वासनानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले. गटविकास अधिकारी किशोर गज्जलवार यांनी ग्रामपंचायतमधील गैरकारभारची समितीकडून चौकशी करण्याचे लेख आश्वासन दिले. त्यानंतर आमदार संजय देरकर व विजय चोरडीया यांनी शरबत पाजून उपोषण सोडविले. या उपोषणाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर आंदोलकांनी औपचारिक उपोषणाला सुरवात केली. होती. मुर्धोनी ग्रामपंचायतीतील तत्कालीन सरपंच व सचिव यांच्या कार्यकाळात ग्रामपंचायतीच्या विविध निनींमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. या गैरव्यवहारांची सखोल व पारदर्शक चौकशी करून संबंधित प्रकरणांचा लेखी अहवाल देण्यात यावा, तसेच ग्रामपंचायत लेखासंहितेनुसार रोखड बुक व बँक स्टेटमेंटच्या आधारे तक्रारदार गावकऱ्यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष पाहणी, पंचनामा व चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तर नेरड ग्रामपंचायतीतील नागरिकांनी दोषी आढळलेल्या तत्कालीन सरपंच, सचिव व संबंधित अधिकाऱ्यांवर ग्रामपंचायत अधिनियमानुसार फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी लावून धरली आहे. तसेच झालेल्या गैरव्यवहाराची रक्कम वसूल करून दोषींवर निलंबनाची तत्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. या बेमुदत उपोषणात नेरड येथील संजय लेडांगे, पांडुरंग ठावरी, गणपत आमने, मनोज ठावरी, रोशन तुरानकर, बंडू झाडे, विठ्ठल लेडांगे, विठ्ठल ठावरी, बबन ठावरी, रवींद्र तलांडे, महादेव कुमरे, गुलाब राखुंडे, सागर वैद्य, सतीश झाडे आदी सहभागी झाले होते. तर मुर्धोनी येथील संदीप भोयर, भारत कारडे, अजय भोयर, प्रेम उमरडेकर, मुन्ना येरेकर, नयन आवारी, ज्ञानेश्वर घुले, संदीप कार्लेकर, प्रवीण फलके आदी नागरिक उपोषणात सहभागी होते.प्रशासनाने यापूर्वी दिलेल्या निवेदनांवर प्रशासनाने अजूनही ठोस निर्णय न घेतल्यामुळे नागरिकांना आमरण उपोषणाचा मार्ग पत्करावा लागल्याचे आंदोलकांनी सांगितले. मागण्या मान्य होईपर्यंत उपोषण सुरूच राहील, तसेच प्रशासनाने वेळेत दखल न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल,

# शेतकऱ्यांनी सोयाबीन विकल्यानंतर वाढले दर



■ आवक वाढली गेल्या काही दिवसांपासून दरात सुधारणा होत होती. तशी बाजारात आवक वाढायला सुरवात झाली आहे. मात्र, यात फार कमी शेतकऱ्यांचे सोयाबीन आहे. जास्त प्रमाणात मोठे शेतकरी तसेच व्यापाऱ्यांचाच माल असल्याचे दिसून येत आहे. सोयाबीन दरात सुधारणा झाल्याने काही प्रमाणात का होईना, शेतकऱ्यांना आधार मिळाला आहे.

■ शेतकऱ्यांनी सोयाबीन विकल्यानंतर आता दर वाढत आहेत. यामुळे दरवाढीचा लाभ फार कमी शेतकऱ्यांना होत आहे. आता शेतकऱ्यांपेक्षा व्यापाऱ्यांकडेच जास्त सोयाबीन आहे. -साहेबराव पाटील, शेतकरी, राळेगाव

▸विदर्भ केसरी। यवतमाळ,

सोयाबीनचे दर वाढतील, या अपेक्षेत शेतकरी होते. मात्र, शेतकऱ्यांच्या घरात सोयाबीन असेपर्यंत दर वाढले नाहीत. सध्या फार कमी शेतकऱ्यांच्या घरात सोयाबीन आहे, आता दरात वाढ झाली असून याचा फायदा शेतकऱ्यांपेक्षा व्यापाऱ्यांनाच जास्त होताना दिसत आहे. सोयाबीन शेतकऱ्याचे हक्काचे नगदी पीक आहे. खरिपातील पिकांमध्ये शेतकऱ्यांना रब्बी हंगामात पैसे देणारे पीक म्हणून सोयाबीन आहे. यंदा अतिवृष्टी तसेच सततच्या पावसाने सोयाबीनच्या उत्पन्नावर परिणाम झाला. गेल्यावर्षी सोयाबीनला मिळालेले दर पाहता यंदा तशीच स्थिती राहील, अशी अपेक्षा शेतकर्‍यांना आहे. त्यामुळेच शेतकऱ्यांनी बरेच दिवस सोयाबीन घरातच ठेवलेले होते. दर न वाढल्याने शेतकऱ्यांना फायदा होण्याऐवजी नुकसान झाले. दर वाढत नसल्याने शेतकऱ्यांनी सोयाबीनची विक्री केली. त्यानंतर आता दरात सुधारणा झाली आहे. सध्यास्थितीत फार मोजक्या शेतकर्‍यांच्या घरात सोयाबीन आहे. त्यामुळे दरवाढीचा फायदा शेतकऱ्यांपेक्षा व्यापार्‍यांनाच होताना दिसत आहे. सोयाबीनचे दर पाच ते पाच हजार ३०० रुपयापर्यंत गेले आहे. पंधरा दिवसांपूर्वी हाच दर ४००० ते ४२०० पर्यंत होता. दरामुळे सोयाबीन लागवडीचा खर्चही वसूल होतो की नाही, या विवंचनेत शेतकरी होते. मात्र, परिस्थितीमुळे शेतकर्‍यांनी सोयाबीनची विक्री केली. यानंतर आता दरात सुधारणा झाली. मात्र, याचा फायदा शेतकर्‍यांपेक्षा व्यापार्‍यांनाच होताना दिसत आहे. जनरल सोयाबीनचे दर पाच हजार तीनशे रुपयांपर्यंत पोहोचले असून बिजवाई सोयाबीनचे दर सहा हजार तीनशे रुपयांपर्यंत आहे.

## बायोमायनिंग निविदा प्रक्रिया नियमबाह्य

### वैशाली सवाई यांचा आरोप; फेरफार शुल्कचा विषय सभेत घेण्याची मागणी

▸विदर्भ केसरी। यवतमाळ

साठलेल्या कचऱ्यावर बायोमायनिंग पद्धतीने प्रक्रिया करण्यासाठी काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेवरून नवा वाद उफाळून आला आहे. ही निविदा प्रक्रिया नियमबाह्य असून, लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता प्रशासनाने कारभार केल्याचा आरोप काँग्रेस गटनेत्या वैशाली सवाई यांनी केला आहे. पहिल्या सर्वसाधारण सभेत घनकचरा व्यवस्थापन, एक टक्के फेरफार शुल्क माफ करणे, महिलांसाठी शौचालय आदी विषय अंजेड्यावर घेण्याची मागणी नगराध्यक्षांना दिलेल्या पत्रात केली आहे.

पालिका स्वच्छता विभागाकडून बायोमायनिंग कामासाठीची निविदा संगणक प्रणालीवर प्रसिद्ध करण्यात आली. मात्र, ही निविदा काढताना नवनिर्वाचित सदस्यांचे अधिकार डावलण्यात आल्याचा आरोप सवाई यांचा आहे. निविदा काढण्यापूर्वी सभागृहाची मान्यता घेणे किंवा बैठकीत ठराव पारीत करणे आवश्यक आहे. यापूर्वी काँग्रेसच्या माजी नगरसेवकांनी आणि पदाधिकाऱ्यांनी या विषयावर उपोषण केले होते. त्यावेळी प्रशासनाने हा विषय सभागृहासमोर चर्चेला घेऊनच पुढील निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, दिलेल्या आश्वासनाचे उल्लंघन करून आता परस्पर टेंडर काढल्याने लोकप्रतिनिधींमध्ये संताप व्यक्त होत आहे. निविदा प्रक्रिया थांबवावी अशी मागणी सवाई यांनी नगराध्यक्ष प्रियदर्शिनी उईके यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. नागरिकांचे विषय पहिल्या सभेत घ्या मालमत्तेवर एक टक्के फेरफार शुल्क आकारण्यात येत आहे. यावर चर्चा करून निर्णय घेण्यात यावा, घनकचरा व्यवस्थापन यावर सविस्तर माहिती देण्यात यावी, सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याची कायदेशीर बाजू तपासून पुनर्स्थापना करण्यात यावी, मुख्य बाजारपेठेत महिलांसाठी शौचालयाची निर्मिती करण्यात यावी, नगरभवन येथे महिला सदस्यांसाठी स्वच्छतागृहाची व्यवस्था, स्वातंत्र सैनिक वस्तू संग्रहालयास पृथ्वीगीर गोसावी यांचे नाव देण्याचा विषय पत्रिकेवर घेण्याची मागणी वैशाली सवाई यांनी नगराध्यक्षांना दिलेल्या पत्रात केली आहे.

## जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने जिल्ह्यातील सर्व नगरसेवकांचा सत्कार



▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी,

**यवतमाळ** यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने दि.22.01.2026 रोजी स्व. बाबुराव षेडमाके प्रबोधिनी, पांढरकवडा रोड, तळेगांव येथे यवतमाळ जिल्हयातील सर्व नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचा जाहिर सत्कार घेण्यात आला. या सत्कार समारंभात मा.श्री.माणिकरावजी ठाकरे, प्रभारी गोवा, दिव-दमन, दादर नगर हवेली, मा.श्री. शिवाजीराव मोघे माजी मंत्री, मा.प्रा.वसंतराव पुरके माजी मंत्री, मा.आ.बाळासाहेब मांगुळकर, मा.डॉ.वजाहत मिर्झा, ॲड.श्री. प्रफुल्ल मानकर, जिल्हाध्यक्ष यवतमाळ, मा.श्री.भय्याजी पवार, सौ.वंदनाताई अवारी अध्यक्ष जिल्हा महिला काँग्रेस कमिटी, श्री.प्रमोद बगाडे अध्यक्ष जिल्हा युवक काँग्रेस, श्री.राजिव कासावार अध्यक्ष यवतमाळ जिल्हा काँग्रेस सेवादल यांच्या उपस्थिती मध्ये हा सत्कार समारंभ संपन्न झाला.

## स्कूल ऑफ स्मार्ट किड्स येथे 'उमंग' वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी / अमोल धवसे




नांदगाव खंडेश्वर येथे दि.२३ जानेवारी २०२६ रोजी स्कूल ऑफ स्मार्ट किड्स या शाळेत 'उमंग' वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले,कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून प्राप्तीताई विलासराव मारोटकर, नगराध्यक्ष, नगर पंचायत नांदगाव खंडेश्वर या उपस्थित होत्या. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सुनीलभाऊ शिरभाते, अध्यक्ष – गुरुकुल एज्युकेशन सोसायटी यांनी भूषविले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गुरुकुल एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष शैलेशभाऊ इखार, सचिव श्री. राम महाजन सर, कोषाध्यक्ष श्री.मनोजभाऊ मनातकर, संचालक श्री. देवेंद्रभाऊ सव्वालाखे, डॉ. प्रफुल्लभाऊ कपडे, संचालिका सौ. ज्योतीताई गजाननराव भेंडेकर, तसेच नगर पंचायतचे उपनगराध्यक्ष शेख जमीर उपस्थित होते. याशिवाय आरोग्य सभापती सौ.ज्योत्स्नाताई अमोलराव धवसे, कांताताई लोमटे, प्रीतिताई इखार, प्रकाशभाऊ मारोटकर,शेख रियाज शेख मुमताज, आयेशा जमील, रजियाबी व सर्व नगरसेवक उपस्थित होते. कार्यक्रमात नवनिर्वाचित नगर पंचायत सदस्यांचा सन्मान करण्यात आला. मागील शैक्षणिक वर्षात इयत्ता १०वी व १२वीमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना मा. ज्ञानेश्वररावजी गावंडे सर यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. तसेच द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना स्व. केशवरावजी सव्वालाखे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्री. देवेंद्रभाऊ सव्वालाखे यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक अयूब शहा यांनी केले. अध्यक्षीय भाषणात सुनीलभाऊ शिरभाते यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला. यावेळी संस्थेचे सचिव श्री. राम महाजन सर व कोषाध्यक्ष श्री. मनोजजी मनातकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंजिरी आंबेकर मॅडम व चैताली डोक मॅडम यांनी केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य व नाट्यप्रयोगांनी उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. पालकांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## अनेक कामात गौडबंगाल

### मनसे चा आंदोलनाचा ईशारा

▸विदर्भ केसरी।ज्योतिबा पोटे

**मारेगाव** तालुक्यात 15 व्या वित्त आयोगाचा शासनाकरवी आलेला लाखो रुपयांच्या निधीचा थातुरमातुर उपयोग करून जनतेची दिशाभूल व बोळवण करीत कंत्राटदार व प्रशासनाने आर्थिक मलिंदा लाटल्याचा आरोप करीत तालुक्यातील कामे पारदर्शक तपासणीसाठी तात्काळ समिती गठीत करून दोषीवर फौजदारी गुन्हे दाखल करा अन्यथा मनसे स्टाईलने आंदोलन छेडण्याचा गर्भीत ईशारा निवेदनातून देण्यात आला.

मारेगाव तालुक्यातील ग्रामपंचायत स्तरावरील विकास कामांकरिता शासनाच्या विविध योजनेंतर्गत निधी उपलब्ध करण्यात येवून यात 15 वित्त आयोग योजनेतील कामात थातुरमातुर कामे करवून निधीचा अपव्यय करण्यात आल्याचे भयावह चित्र तालुक्यात आहे.अनेक कामे दर्जाहीन करीत आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे दबक्या आवाजात बोलले जात आहे.त्यामुळे पदाधिकारी व प्रशासकीय कर्मचारी बाबत साशंकता निर्माण होत अनेक ग्रामपंचायत मधील परस्पर उचल संशयाच्या भोवऱ्यात सापडली असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला आहे.

तालुक्यात झालेल्या कामांची, जमाखर्चाची व देयकांची सखोल चौकशीसाठी तात्काळ समिती गठीत करून दोषीवर कडक शासन करावे अन्यथा मनसे आपल्या स्टाईलने आंदोलन छेडून वठणीवर आणेल अशा आशयाचे निवेदन स्थानिक ते जिल्हापातळीवर जिल्हाउपाध्यक्ष संतोष रोगे यांनी दिले आहे.

## 'साई'चा फ्लोअर संघ शालेय राज्यस्तरावर

▸विदर्भ केसरी। यवतमाळ



यवतमाळ दि. 24 जानेवारी :- महाराष्ट्र शासनाच्या युवक व सेवा संचलनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यवतमाळ व जिल्हा क्रीडा परिषद यवतमाळ यांच्या सैयुक्त विद्यमाने आयोजित अमरावती विभागीय शालेय फ्लोअरबॉल क्रीडा स्पर्धेत श्री साई विद्यालय लोहारा यवतमाळनी सतरा वर्षाआतील मुलं व मुलीत व एकोणीस वर्षे गटातील मुलीने तिहेरी विजेतेपद पटकावून आपली परंपरा कायम ठेवत शालेय राज्यस्तरीय फ्लोअर बॉल क्रीडा स्पर्धेत आपली पात्रता सिद्ध केली. यवतमाळच्या जिल्हा क्रीडा संकुलातील लॉन टेनिस कोर्टवर शालेय सतरा व एकोणीस वर्षा आतील विभागीय फ्लोअर बॉल क्रीडास्पर्धा नुकत्याच झाल्या. सतरा वर्षे मुलात मयंक ठाकरे, आर्यन राठोड, वंश इंगळे, मयूर भारसाकळे, मयूर मडावी, अंश बाविस्कर, मिथिलेश बडे, रोहन कांनदे, प्रशील बेलखेडे, तन्मय डोईजड, संकेत राठोड, अनिकेत देवगडे, वेदांशू नामेकर, समर्थ ठाकरे व मुलीत माही साखरकर,, अनुष्का ठोकळ, गौरी सकारापुरे, श्रावणी अढाव,प्रियंका वाघमारे, श्रावणी खटारे, रिया कुरसंगे, समृद्धी साखरकर, काजल गोडे, निलम अंजले, अश्विनी गजभार, प्रतीक्षा कोठेकर, गुणगुण मडावी, साक्षी झोंबाडे, इशिका पेठे आणी एकोणीस वर्षे मुलीच्या संघात अक्षरा भारसाखळे, चैताली भोयर, जान्हवी प्रचाके, संध्या खटारे, ऋतुजा पुरी, समीक्षा कुरसंगे, दीपाली राऊत, कांचन कोल्हारे, प्रणाली साबळे, प्राजक्ता कांबळे, आराध्या राठोड, काजल जाधव, अश्विनी सारसे यंचा सहभाग आहे. शाळेचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब इंगोले, माजी मुख्याध्यापक मनोज इंगोले, मुख्याध्यापक अजय भटकर, शारीरिक शिक्षण शिक्षकव क्रीडा प्रशिक्षक जितेंद्र सातपुते यांचे मार्गदर्शन लाभले. प्रविण्यप्राप्त खेळाडूचे स्पर्धा संयोजक क्रीडा अधिकारी चैताली राऊत, क्रीडा अधिकारी सचिन हरणे, फ्लोअर बॉल असोसिएशन अध्यक्ष अमोल बोदडे,उप्पाध्यक्ष मनोज येंडे, सहसचिव सचिन भेंडे,शिक्षक विजय चौधरी, वनदेव माघाडे, अभय दुधाटे, वैशाली शहाडे, अर्चना डहाके, जयश्री देशमुख, रवि उईके, किशोर यादव आई वडील आदिनी गौरव करून सत्कार केला.

## वणीत प्रवेश करताच चॅम्पियन मनस्वीचा गौरव

### ५० किमी अंतर स्केटिंगने केले पार

▸विदर्भ केसरी। वणी




मारेगाव तालुक्यातील बोटोणी येथील अवघ्या सात वर्षांच्या चिमुकली स्केटिंगपटू मनस्वी विशाल पिंपरे हिने आज शुक्रवारी (ता. २४) पांढरकवडा ते वणी हे तब्बल ५० किलोमीटरचे अंतर स्केटिंगने पार करुन वणीत धाडसी प्रवेश केला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल वणीत विविध संस्था, राजकीय पक्ष व नागरिकांच्या वतीने तिचा जाहीर सत्कार करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विजय मुकेवार तर मनसेचे नेते राजू उंबरकर, रोटरी क्लब वणीचे अध्यक्ष लवलेश लाल यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी आपल्या भाषणांतून मनस्वीने आतापर्यंत केलेल्या विक्रमी कामगिरीचा गौरव करत तिच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. लोकमान्य टिळक महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रोटरी क्लब वणी तसेच वणी प्रेस वेलफेअर असोसिएशन यांच्या वतीने तसेच अनेकांनी वैयक्तिक रित्या मनस्वीचा शाल व मानचिन्ह देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे संचालन अभय पारखी यांनी केले तर मनसेचे तालुका अध्यक्ष फाल्गुन गोहोकार यांनी आभार प्रदर्शन केले. मनस्वी सध्या प्रशिक्षक विजय मलयजी यांच्या मार्गदर्शनाखाली स्केटिंगचे प्रशिक्षण घेत आहे. मनस्वी वयाच्या तीनव्या वर्षापासून स्केटिंगचा सराव करत आहे. सलग ९६ तास स्केटिंग करण्याचा विक्रम केवळ चार वर्षांच्या कालावधीत मनस्वीने गीनीज वर्ल्ड रेकॉर्डसह १०४ सुवर्णपदके, १४ रौप्य व १२ कांस्य पदके पटकावली आहेत. सलग ९६ तास स्केटिंग करण्याचा विक्रम, तसेच ५० मीटर फायर लिम्बो स्केटिंग यशस्वीरीत्या पूर्ण करण्याची कामगिरीही तिच्या नावावर आहे. विविध प्रकारचे ३०हून अधिक पुरस्कार मनस्वीने मिळवले आहेत. आतापर्यंत तिने १ आंतरराष्ट्रीय, ११ राष्ट्रीय, १२ राज्यस्तरीय व ६४ जिल्हास्तरीय स्केटिंग चॅम्पियनशिपमध्ये यश संपादन केले आहे.

## अखेर 'अरुणावती'वर कठडे

### परवेज बेग यांच्या निवेदनाची दखल

▸विदर्भ केसरी। आर्णी प्रतिनिधी:बबिता शिवणकर



सामाजिक कार्यकर्ते यांच्या निवेदनाची दखल उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग आर्णी यांनी घेतली असून अरुणावती नदीपूलावरील लोखंडी कठडे बसविण्यास प्रारंभ झाला आहे,

अरूणावती नदीला पूर आल्याने पूरामूळे अरुणावती नदीपूलावरील लोखंडी कठडे वाहून गेली होती तेव्हा पासून लोखंडी कठडे वाहून गेल्याने याकडे सार्वजनिक बांधकाम उपविभाग आर्णी दूर्लेक्ष करित होते या गंभीर बाबीकडे सामाजिक कार्यकर्ते परवेज बेग मिर्झा यांनी लक्ष देवून ता,19 जानेवारीला उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग आर्णी यांना निवेदन देवून येत्या पांच फेब्रूरवारी पासून सर्वधर्मीयाचे श्रध्दास्थळ बाबा कम्बलपोष यात्रेचा प्रारंभ होत असून तसेच या अरुणावती पूलावरुन दूचाकीस्वार,वाहन धारक,तसेच ग्रामीण भागासह शहराची मोठी रहदारी राहते अरुणावती नदीपूलावर सूरक्षा नसल्याने मोठी जीवतहानी होऊ शकते,व उर्स यात्रेची पूढील होणारी भाविक भक्ताची गर्दी लक्षात घेता अरुणावती नदीपूला वरील लोखंडी कठडे तात्काळ बसविण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते परवेज बेग मिर्झा यांनी

उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग आर्णी यांना निवेदना व्दारे केली होती परवेज बेग यांच्या निवेदनाची दखल म्हणून सार्वजनिक बांधकाम उपविभाग आर्णी यांनी घेतली असून अरुणावती नदीपूलावरील लोखंडी कठडे बसविण्यात प्रारंभ झाल्याने परवेज बेग यांचे सर्वस्तरावरुन कौतूक होत आहे

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
रविवार, २५ जानेवारी २०२६ | ४
GOOD MORNING
अकोला+वाशिम
!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## ‘यूट्यूबवर पाहून घेतलेल्या औषधामुळे तरुणीचा मृत्यू

तामिळनाडू, t तामिळनाडूमध्ये वजन कमी करण्यासाठी यूट्यूबवरील माहितीवर विश्वास ठेवून औषध घेतल्यामुळे एका कॉलेज विद्यार्थिनीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना औषध घेण्यापूर्वी योग्य खबरदारी घेण्याचे महत्त्व पुन्हा अधोरेखित करते. मदुराईच्या सेलूर भागातील मीनांबलापूरम येथील कलैयर्सी ही एका खासगी महाविद्यालयात पदवीच्या पहिल्या वर्षात शिकत होती. वजन कमी करण्याच्या हेतूने तिने यूट्यूबवरील एका व्हिडिओत दिलेल्या माहितीनुसार स्थानिक मेडिकल दुकानातून बोरॅक्स खरेदी केले.

# पथविक्रेत्यांना मिळणार आता क्रेडीट कार्ड

▸विदर्भ केसरी। मुर्तिजापूर

**आज दिनांक २३ जानेवारी २०२६ शुक्रवार रोजी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज तिरुअनंतपुरम, केरळ येथे भेट देऊन प्रधानमंत्री स्वनिधी योजनेअंतर्गत देशभरात एक लाख कर्जाचे वितरण तसेच क्रेडिट कार्डाचे उदघाटन लाईव्ह कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गृह निर्माण व शहरी कार्य मंत्रालय यांच्या निर्देशानुसार नगर परिषद मुर्तिजापूर जिल्हा अकोला येथे येथे आज या कार्यक्रमाचे लाईव्ह प्रसारण करून क्रेडिट कार्ड व कर्जाचे वितरण मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. उपस्थित सर्व पथविक्रेता यांना क्रेडिट कार्ड योजनेचे उदघाटन करून मा.प्रधानमंत्री यांनी संबोधित केले.**




मुख्याधिकारी निलेश जाधव यांचे मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रमाचे आयोजन न.पा. सभागृहात करण्यात आले होते. कार्यक्रमाचे औचित्य साधून मा. नगराध्यक्ष हर्षल साबळे, उपाध्यक्ष रोहित अव्वलवार यांचे हस्ते २५ लाभार्थी यांना दुसरा व तिसरा टप्पा रु २५ व ५० हजार चे वितरण करण्यात आले व स्टेट बँक ऑफ इंडिया मुर्तिजापूर चे व्यवस्थापक प्रशांत माने यांचे हस्ते योगेश वानखडे या पथविक्रेत्यांला क्रेडिट कार्ड मंजुरी पत्र वितरित करण्यात आले. यावेळी सोनल मुकेश काळबांडे सभापती महिला बालकल्याण समिती, नगरसेवक गजानन नाकट , भूपेंद्र पिंपळे, लखन मिलांदे, राम जोशी, बँक ऑफ इंडिया चे व्यवस्थापक अजय गिऱ्हे, सेंट्रल बँक ऑफ इंडिया च्या फील्ड ऑफिसर योगिता वानखडे , पथविक्रेता समितीचे सदस्य डीगांबर सदार, गंगा खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

योजनेचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी राजेश भुगुल यांनी आज रोजी पर्यंत ८५९ पथविक्रेत्यांना रु. २ कोटी १४ लक्ष इतके कर्ज स्वनिधि योजने अंतर्गत राष्ट्रीकृत बँका मार्फत वितरित करण्यात आल्याची माहिती उपस्थितांना दिली , तसेच सदर योजनेतील लाभार्थींना विविध आठ योजनेत त्याचे सामाजिक आर्थिक सर्वेक्षणाचे आधारे लाभ देण्यात येत असल्याचे सांगितले, तसेच द्वितीय कर्ज पूर्णपणे परतफेड केलेल्या लाभार्थींना रु. ३० हजार लिमिट असलेले क्रेडिट कार्ड देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सदर क्रेडिट कार्ड मिळविण्याकरिता लाभार्थींना ऑनलाईन पोर्टल वर बँक कडे अर्ज सादर करा लागेल. तसेच प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजने अंतर्गत विशेष नोंदणी मोहीम राबविण्यात येत असून या मध्ये १५ फेब्रुवारी पर्यंत पी. एम .एस .वाय .एम. व एनपीएस ट्रेडर्स योजने अंतर्गत असंघटित क्षेत्रातील कामगार, फेरीवाले, छोटे व्यापारी, मजूर, घरगुती कामगार इत्यादी यांनी सदर योजनेची नोंदणी करून पेन्शन प्लॅन चा लाभ घेण्याचे व या योजने बाबत अधिक माहिती करिता नगर परिषद येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले

### लाभ घेण्याचे आवाहन

**या वेळी नगराध्यक्ष हर्षल साबळे यांनी संबोधित करत या योजनेचा मुर्तिजापूर शहरातील जास्तीत जास्त फेरीवाला व पथ विक्रेता यांनी पहिला टप्पा १५ हजार, दुसरा टप्पा २५ हजार व तिसरा टप्पा ५० हजार ची परतफेड करून लाभ घ्यावा असे आवाहन करून आज पर्यंत झालेल्या कामाचे कौतुक केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परेश बुरघाटे सिस्टीम सपोर्ट अभियंता, शहर स्तर संघाच्या अध्यक्षा दुर्गा मोहिते, रुबीना परवीन समुदाय संघटिका, विलास ठाकरे, अमोल तायडे, नितीन शिंगणे यांनी सहकार्य केले.कार्यक्रमाला अधिकारी कर्मचारी व शहरातील पथविक्रेता मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## महत्त्वाचे



## शिवसेना तर्फे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षी जयंती उत्साहात

▸विदर्भ केसरी। दर्यापूर -

शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षी जयंती शिवसेना अमरावती मा. जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट मित्र परिवाराच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली सर्वप्रथम हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला हार अर्पण करण्यात आला त्यावेळी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो,जय भवानी जय शिवाजी अशा गगनचुंबी घोषणा देण्यात आल्या. त्यावेळी भारतीय जनता पक्षाचे विजय मेंढे , मेघाताई भारती यांनी भेट देऊन शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला हार अर्पण केला त्यावेळी सुनील डीके जिल्हाप्रमुख,तालुकाप्रमुख गणेश लाजूरकर, प्रदीप मलिये नगरसेवक, रवींद्र गणोरकर , राजेंद्र गायगोले,मनोज तायडे नागोराव केने, टिक्कू पाटील, अतुल सगने, संजय राणे,राम गावंडे, राहुल भुम्बर ,सागर गेठे ,माणिकराव मानकर योगेश बुंदे, सोपान कुटेमाटे, विलास साखरे, स्वप्नील मात्रे अक्षय भोंडे,सौरभ वायझाडे, आकाश फुंडकर, गोकुळ चांदुरकर,श्रीजीत सुरजुसे अक्षय आठवले, शरद आठवले,हेमंत हेमंत ऊमाळे ,सूरज पाचखडे, श्रीजीत सुरजुसे श्याम पाटील साखरे रोहित बायस्कर सोबत अश्विनीताई अरबट,साक्षी खेडकर,भाग्यश्री सगने, भारती राऊत इत्यादी उपस्थित होते



## विद्यार्थ्यांनी जिंकली पालकांची मने !

▸विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर

**बाळापूर :** तालुक्यातील वाडेगाव येथील अटल बिहारी वाजपेयी अंतर राष्ट्रीय शाळे मध्ये दोन दिवसीय स्नेहसंमेल मोठ्या उत्साहात पार पडले तर चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांचे मने जिंकली. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात प्रारंभी दिप प्रज्वलीत करून तसेच महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी अभिवादन केले. त्यावेळी केंद्र प्रमुख माधव काळे . उच्च श्रेणी मुख्याध्यापक समाधान सोर यानी कार्यक्रमाची फीत कापून मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन केले. यावेळी जिप शाळेतिल कॉन्व्हेटच्या विद्यार्थ्यांनी एका पेक्षा एक सरस सादरीकरण केले . तसेच दुपारच्या सत्रात वर्ग ८ ते ६ च्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गित तसेच भावगीत लोकगीतावर नृत्य सादर केले. त्यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा भाग्यश्री हिराळकर व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य तसेच सर्व सदस्य आणि पत्रकार राजकुमार चिंचोळकर, चंदन जंजाळ, योगेश कांडारकर व पालक वर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्ये उपस्थित होते तर २३ जाने राजी वर्ग १ ते ५ पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे २४ जाने रोजी आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिक्षक केशव घाटोळ . प्रिया देशमुख मॅडम तर आभार, सुरेंश कातखेडे याने मानले. शाळेत आयोजित स्नेहसंमेलनाच्या परिपूर्णते मुख्याध्यापक समाधान सोर शिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख मापारी चर्चेत

▸विदर्भ केसरी।वाशीम/संतोष काळे :-

सध्या राज्यातील राजकीय वातावरण तापलेले असतानाच, वाशिम



शिवसेना (उबाठा) चे जिल्हाप्रमुख सुरेश मापारी यांचा एक फोटो सोशल मीडियावर सध्या तुफान व्हायरल होत आहे. या फोटो मुळे जिल्ह्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून मापारी पक्षांतर करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. मात्र, प्रसार माध्यमांनी ने केलेल्या थेट पडताळणीत या सर्व चर्चा फोल ठरल्या असून, मापारी यांनी स्वतः समोर येत या अफवांचा पडदाफाश केला आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या फोटोमध्ये सुरेश मापारी हे राज्याच्या सत्ताधारी गटातील प्रमुख नेत्यां सोबत अर्थात उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोबत दिसत आहेत हा फोटो समोर आल्याने वाशिम जिल्ह्यातील शिव सैनिकां मध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. "मतदार ज्या निष्ठेने मतदान करतो, ती निष्ठा आता सत्तेच्या बाजारात लिलावात निघाली आहे का?" असा प्रश्न विचारला जात होता. या व्हायरल फोटोची सत्यता जाणून घेण्यासाठी प्रसार माध्यमांनी थेट सुरेश मापारी यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी अत्यंत आक्रमक आणि स्पष्ट शब्दांत आपली भूमिका मांडली. ते म्हणाले की, "सध्या जो फोटो व्हायरल केला जात आहे, तो फार जुना आहे. जाणीवपूर्वक चुकीची चर्चा घडवून आणण्यासाठी हा प्रकार केला जात आहे," असे मापारी यांनी स्पष्ट केले. यावेळी मापारी म्हणाले की, "आम्ही 'उद्धव बाळासाहेब ठाकरे' यांच्या शिवसेनेतच आहोत आणि तिथेच राहणार. वाशिमच्या जनतेने आमच्यावर जो विश्वास टाकला आहे, तो आम्ही तोडणार नाही." असा त्यांनी. संदेश दिला आहे.

### मातोश्रीवर काल भेट

**काल शनिवारी २४ जानेवारी रोजी सुरेश मापारी यांनी मुंबईत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली असून, पक्षातील आगामी रणनीतीवर चर्चा झाली असल्याचेही त्यांनी सांगितले.**

# सुपर थर्मल पॉवर स्टेशनमध्ये भ्रष्टाचाराचा महापूर

### मुख्य अभियंत्यांवर गंभीर आरोप

▸विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड-:

आशिया खंडातील सर्वात मोठे ऊर्जा केंद्र म्हणून ओळख असलेल्या चंद्रपूर सुपर थर्मल पॉवर स्टेशनमध्ये सध्या कंत्राटांच्या वाटपावरून मोठा गदारोळ माजला आहे. मुख्य अभियंता विजय राठोड आणि त्यांचे कथित निकटवर्तीय विकी राठोड यांच्या कार्यकाळात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा खळबळजनक आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) ज्येष्ठ नेते सुनील दहेगावकर यांनी केला आहे.

**'मर्जीतील' कंत्राटदारांनाच झुकते माप -:**

सुनील दहेगावकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, मागील एक वर्षापासून विजय राठोड मुख्य अभियंता म्हणून रुजू झाल्यापासून सुपर थर्मल स्टेशन



मध्ये पारदर्शकता हरवली आहे. विकी राठोड नावाच्या व्यक्तीचा या संपूर्ण प्रक्रियेत मोठा हस्तक्षेप असून, ते प्रत्येक विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना फोन करून विशिष्ट कंत्राटदारांसाठी फाईल तयार करण्यास भाग पाडतात, असा आरोप दहेगावकरांनी केला आहे.

प्रमुख आरोप खालीलप्रमाणे आहेत: नियोजित भ्रष्टाचार: कोणत्या कामाला बजेट द्यायचे आणि कोणाला वर्क ऑर्डर द्यायची, याचे सर्व अनधिकृत अधिकार विकी राठोड यांना देण्यात आल्याचा दावा.

**टक्केवारीचे गणित:**

संबंधित अधिकाऱ्यांकडून आणि त्राटदारांकडून ठराविक टक्केवारी घेऊनच कामे दिली जात असल्याचे निवेदन मुख्यमंत्र्यांना देण्यात आले आहे. **DPR चा घोळ:** २५ कोटींच्या वरचे अनेक अनावश्यक DPR तयार करून सुमारे १०० कोटींहून अधिकची कामे आपल्या मर्जीतल्या कंपन्यांना देण्यात आली आहेत.

"एवढ्या मोठ्या प्रमाणावर DPR काढण्याची गरज नव्हती, तरीही केवळ आर्थिक फायद्यासाठी हे सर्व केले गेले. या संदर्भात सुनील दहिगावकर व त्यांची शिष्टमंडळ राज्याचे मुख्यमंत्री ऊर्जा सचिव आणि महावितरण चे एमडी राधाकृष्ण डी यांचे भेट घेऊन पुरावे सादर केलेले आहेत तरीही एमडी राधाकृष्णजी यांनी या प्रकरणी चौकशी करून कारवाई करण्याचे असून दिले होते मात्र अनेक दिवस उलटूनही अद्याप कोणतेही ठोस पावले उचलले गेले नाहीत यामुळे सतत झालेल्या सुनील दहेगावकर यांनी आता आक्रमक पवित्रा घेतला आहे जर लवकरात लवकर दोषींवर कारवाई झाली नाही आणि या कामाची सकल चौकशी झाली नाही तर केवळ चंद्रपूर मध्ये नव्हे तर एमडी राधाकृष्ण डी यांच्या ऑफिस बाहेर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला आहे या प्रकरणामुळे ऊर्जा विभागात खळबळी उडाली असून आता सरकार या भ्रष्टाचाराच्या आरोपावर काय भूमिका घेते याकडे सगळ्यांचे लक्ष लागले

## विद्यार्थ्यांचे राजस्तरीय स्पर्धेत यश




▸विदर्भ केसरी। चांदूरबाजार :

अमरावती येथील पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी येथे २० जानेवारी २०२६ रोजी आयोजित राजस्तरीय Techlons स्पर्धेत सुमतीदेवी टोम्पे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्स अँड रिसर्च, चांदूरबाजारच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेच्या यशात भर घातली. या स्पर्धेत विविध तांत्रिक व शैक्षणिक प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याचा उत्कृष्ट परिचय देत पारितोषिके पटकावली. मॉडेल स्पर्धेत डी. फार्मसी द्वितीय वर्षाच्या कु. गुंजन राजकुमार वैद्य, कु. तृप्ती अरविंद कदम, कु. काजल रामेश्वरराव पडोळकर आणि कु. सानिका सुनील सावरकर यांनी नाविन्यपूर्ण संकल्पना आणि प्रभावी सादरीकरणाच्या जोरावर प्रथम पारितोषिक मिळवून संस्थेचा गौरव वाढवला. तसेच पोस्टर स्पर्धेत डी. फार्मसी प्रथम वर्षाच्या कु. अलीना महीन शेख अंझार, कु. नौशबा निगारिश झाकीर अहमद आणि कु. सुहाना आझमी शेख सलीम यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत अंकुश गंगाराम डोमळे, कु. अंजलिना शेख अब्दुल आसिफ, मोहम्मद सिद्दीक शेख मुख्तार, मोईनुद्दीन नाझिमुद्दीन, यश अनिलपंत तायडे, प्रज्वल दीपक काळे, प्रणव दामोदर आगे, कु. माहीन कशफ सय्यद मजहर अली, कार्तिक पांडुरंग सोळंके, शेख झीशान मुदब्बीर शेख हारून आदी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नाविन्यपूर्ण कल्पना, तांत्रिक ज्ञान आणि प्रभावी सादरीकरणामुळे परीक्षकांची मने जिंकली. या यशामुळे सुमतीदेवी टोम्पे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्स अँड रिसर्च, चांदूरबाजारचे नाव राज्यस्तरावर उज्ज्वल झाले आहे. या यशामागे सांस्कृतिक समन्वयक प्रा. कु. गायत्री मोतीरामजी पोलाखरे तसेच इतर प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे प्राचार्य डॉ. राहुल विलास जोध, अध्यक्ष श्री. भास्करदादा टोम्पे आणि सचिव डॉ. विजयभाऊ टोम्पे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

## रिसोड तालुक्यातील चिखली येथे चोरांचा धुमाकूळ

### चार ते पाच घरांवर एकाच रात्री घरफोडी

▸विदर्भ केसरी। वाशीम :-

रिसोड तालुक्यातील चिखली गावात अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घालत चार ते पाच ठिकाणी घरफोडी केल्याची घटना उघडकीस आली असून, त्यामुळे संपूर्ण गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरट्यांनी रोख रक्कम व सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला मारत लाखोंचा ऐवज लंपास केला आहे. प्राप्त माहितीनुसार, भिकाजी पुंड, कैलास घाटोळ, भगवान घाटोळ, पंडित घाटोळ, रवी अंभोरे तसेच न्यानेश्वर लाड यांच्या घरांना चोरट्यांनी लक्ष्य केले. या घरांमधून अंदाजे रोख रक्कम सुमारे ३ लाख रुपये व सोन्याचे दागिने अंदाजे ३ तोळे असा मोठ्या प्रमाणात ऐवज चोरीस गेला आहे. ही चोरीची घटना रात्रीच्या सुमारास घडली असल्याचा अंदाज असून, सकाळी घरमालकांच्या निदर्शनास येताच गावात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच संबंधित नागरिकांनी तात्काळ पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. सलग अनेक घरांवर एकाच वेळी झालेल्या घरफोडीमुळे रिसोड तालुक्यातील चिखली गावात दहशतीचे वातावरण पसरले आहे. चोरट्यांचा लवकरात लवकर छडा लावावा तसेच रात्रीची पोलीस गस्त वाढवावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## सौ स्वाती सदार यांनी जोपासले दायीत्व

### निर्वासित महिलांसमवेत साजरा हळदिकुंकु व वान भेट

▸विदर्भ केसरी। संतोष काळे

**वाशीम** रिसोड येथील ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ खडकी सदार च्या अध्यक्षा सौं स्वाती ज्ञानेश्वर सदार पाटील यांचा एक अगळा वेगळा उपक्रम मोठा थाटमाट व गाजावाजा आणी सजावट दिखाऊपणा च्या पलिकडे महिलांच्या सौभाग्याच लेन असलेल्या, हळदिकुंकु चा खरा संदेश निर्वासित व रस्त्यावर राहगुजरी करणाऱ्या महिला सोबत साजरा करत आगळावेगळा उपक्रम राबल्याने सर्वत्र कौतुक होत आहे

भली मोठी सजावट व दिखाऊपणा ला फाटा देत ज्या महिलांना साध दारावर सध्या कुणी उभं ठेवायला धजावतं अशा महिलांना सोबत घेवून व त्यांना घरगुती वापरात येणाऱ्या वाना सह स्वतः त्यांच्यात जाऊन हळदिकुंकु चा कार्यक्रम करनारी व जिल्हा भरात पहिला उपक्रम राबवनारी समाज सेवीका म्हणून चर्चेत आहे, त्यांच्या कडुन याबाबत विचार केली असता त्यांनी दैनिक विदर्भ केसरी सोबत बोलतांना सांगितले की आपण नेहमी आपल्या गावा मध्ये घरी सोसायटी मध्ये हळदी कुंकू कार्यक्रम घेतच असतो पण मी रोज या रोड वरून ये जा करते पण रोड च्या बाजूला बाहेर गावं वरून आलेलं लोकांना व महिलांना कसला सन कसला आनंद कारण त्यांना पोट भरण्यासाठी रोज काम करून अलग अलग गावा मध्ये जावे लागते पण माज्या मनात विचार चालू होता आणी आम्ही आमच्या घरी सोसायटी मध्ये व आज किसनराव सदार विदयालय मध्ये पण हळदी कुंकू कार्यक्रम साजरा केला पण माझ्या मनात विचार चालू होता कि ह्या महिला रोड वर राहतात यांना कसला



कार्यक्रम वा कुठला सनवार नाही पण मी माझ्या पती डॉ ज्ञानेश्वर भारत सदार यांना म्हटलं कि मी या महिलांन सोबत हळदी कुंकू कार्यक्रम करू का? त्यांनी लगेंच हो म्हटले, आणि म्हणाले की चांगला उपक्रम आहे करा त्यांचा सन्मान. मी लगेच 51भेट वस्तू घेतल्या आणी लगेच सगळ्या महिलांना जमा केले आणी त्याच्या सोबत आनंद साजरा केला त्या महिलांना हळदी कुंकू आणी तीळ गूळ भेट वस्तू व लहान मुलाबरोबर खाऊ वाटप केला पण माझ्या आणी त्यांच्या सर्व महिलांना व लहान मुलांना त्यांच्या पुरुषांना पण खूप आंनद झाला आणी नेहमी या लोकांन साठी असे वेग वेगळं उपक्रम घेत राहील आणी सर्व सामाजिक संस्था प्रतिनिधी यांना विनंती करतो कि अश्या लोकांन साठी काम करत राहील आणी आपण हि सर्वांनी असे उपक्रम घयावे आणी सर्वोतरी प्रयत्न करू या कार्यक्रम साठी माझे पती डॉ ज्ञानेश्वर सदार पाटील यांनी खूप सहकार्य केले मी त्यांचे व माझा मुलगा शिवराज चे खूप खूप धन्यवाद देते असेच आपले सहकार्य व मार्गदर्शन लाभत राहील आणी अपाले आशीर्वाद राहतील अशीच सेवा करण्यासाठी असेच प्रोत्साहन व मदत द्यावी

# विधवा महिलेचे मुलांसमवेत पंचायत समिती प्रांगणात उपोषण

### राजकीय स्वार्थापायी ग्रामरोजगार सेवक पदापासून वंचित ठेवल्याचा आरोप.

▸विदर्भ केसरी। मानोरा :--

तालुक्यातील तिर्थक्षेत्र आसोला खुर्द ह्या गावची निवासी असलेली महिला मंगलाबाई उल्हास राठोड आपल्या तीन मुलांसमवेत त्यांच्या मागणीकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष केल्या जात असल्याच्या विरोधात न्याय मिळणे करिता उपोषणाला बसलेली असल्याने ग्रामरोजगार सेवक निवड प्रक्रियेचा राजकीय स्वार्थासाठी कसा वापर केला जातो हे विधवा महिलेच्या उपोषणाने परत एकदा अधोरेखित झालेले आहे. तालुक्यातील अनेक गावातील रोजगार सेवकांची निवड ही सरपंच पदावर असलेल्या व्यक्तीचे राजकीय




भवितव्य सुरक्षित ठेवण्यासाठी उपयोगात आणले जात असून त्याचाच प्रत्यय आसोला या गावी नेमणुकीला असलेले व खोट्या तक्रारी झाल्याच्या तणावातून पती मयत झाल्याची बाब संबंधित ग्राम रोजगार सेवकाच्या विधवा पत्नीकडून करण्यात आला आहे. उल्हास नारायण राठोड हे आसोला येथील ग्रामरोजगार सेवक होते त्यांच्या विरोधात गावातील काही असामाजिक तत्त्वांनी खोट्या तक्रारी नोंदविल्याने त्यांचा मानसिक ताण येऊन उल्हास नारायण राठोड यांचे गतवर्षीच्या १३ नोव्हेंबर रोजी निधन झाल्याचा आरोप त्यांच्या विधवा मंगलाबाई राठोड यांनी निवेदनामध्ये नमूद केले आहे. मयत ग्राम रोजगार सेवक यांच्या नेमणुकीच्या जागेवर विधवा पत्नी अथवा कुटुंबातील पाल्यापैकी कुणाचे तरी नेमणूक प्राधान्य क्रमाने करण्यात येऊन मयत रोजगार सेवकाच्या उघड्यावर पडलेल्या कुटुंबाला आधार दिला जाईल असे आश्वासन स्थानिक महिला सरपंच आणि ग्राम सचिवांनी दिले होते त्या आश्वासनाची पूर्ती राजकीय स्वार्थापाई भलत्याच व्यक्तीची नेमणूक करून विधवा असलेल्या मंगलाबाई आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या त्यांच्या मुलांवर करण्यात आल्याचा रोष उपोषणकर्त्या विधवा महिलेकडून करण्यात आला आहे. ग्रामरोजगार सेवक हे मोठ्या प्रमाणात सरपंचांच्या आशीर्वादाने केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानित योजनांमध्ये आर्थिक देवाणघेवाण करून खोटी नाटी देयके काढतात. अशा असंख्य तक्रारी यापूर्वी अनेक रोजगार सेवकांवर झालेल्या असूनही तालुका पंचायत प्रशासन संबंधित सरपंच व ग्रामसचिवांच्या होला हो लावून डोळे मिटून कागदे नाचवीत असतात हे यापूर्वी तालुक्यात अनेक वेळा गाजले आहे. मात्र आसोला येथील ग्राम रोजगार सेवकावर खोट्या तक्रारी करण्यात आल्याच्या त्यांच्या विधवा महिलेकडून प्रशासनाकडे निवेदने देऊनही या निवेदनांचा विचार तालुका प्रशासनाकडून का करण्यात आला नाही हा सवाल सुद्धा विधवा महिला आपल्या मुलाबाळांसमवेत उपोषणाला बसल्याने निर्माण होत आहे.

**आसोला खुर्द येथील ग्रामरोजगार सेवक पदावर निवड न झाल्यास उपासमारीने मरण्यापेक्षा आम्ही आत्महत्येचा मार्ग स्वीकारू असे सुद्धा उपोषणाला बसलेल्या महिलेच्या वतीने निवेदनामध्ये नमूद करण्यात आलेले असल्याने हे प्रकरण काय वळण घेते व तालुका प्रशासन या विषयाला कसे हाताळते हे काही दिवसात पुढे येणार आहे.**

## गोगाव येथे नागोबा देवाची जत्रा साजरी होणार, गडचिरोलीचे व परिसरातील भाविक पूजा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे



गडचिरोली : गडचिरोली पासून अवघ्या दोन तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या गडचिरोली तालुक्यातील मौजा गोगाव येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही नागोबा देवाची जत्रा मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. त्यामुळे 25 जानेवारी 2026 रोजी येथे जत्रेचे आयोजन करण्यात आले. गोगाव येथील मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होत असते. गेल्या कित्येक वर्षापासून ही परंपरा चालू असून गडचिरोली शहराला लागूनच असलेल्या दोन्ही गावांमध्ये नागोबा देवाची जत्रा भरवली जाते. सुरुवातीला कोटगल येथे भरवली जाते. व दुसऱ्या दिवशी गोगाव येथे नागोबा देवाची जत्रा भरवण्यात येथे. यामध्ये गडचिरोली परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होतात. व गावामध्ये मोठ्या प्रमाणात नाटकाचा प्रयोग सदर केला जातो. त्याच निमित्ताने आपले नातेवाईक येत असतात आणि तिथे नागोबा देवाचे दर्शन घेऊन रात्रोला नाटकाचा आस्वाद घेतात.

# संक्षिप्त



## कुही तालुक्यातील अडम गावात भागवत सप्ताह उत्साहात साजरा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

कुही तालुक्यातील अडम गावात दिनांक 23 जानेवारी 2026 रोजी आयोजित करण्यात आलेल्या भागवत सप्ताहाच्या समारोपीय कार्यक्रमात भक्तीमय वातावरणात विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम पार पडले. या कार्यक्रमात पंढरपूर पायी वारी करणाऱ्या श्रीमती सुमनताई आष्टणकर यांचा विशेष शुभ सत्कार करण्यात आला. सदर सत्कार सौ. शालिनीताई शेलोकर, सरपंच – अडम यांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मोठ्या सन्मानाने करण्यात आला. भागवत सप्ताहाच्या निमित्ताने गावात कीर्तन, प्रवचन व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहामुळे गावात भक्तीभाव, एकोप्याची भावना व सामाजिक सलोखा वाढीस लागल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. पंढरपूर वारीसारख्या परंपरेचे जतन करणाऱ्या श्रीमती सुमनताई आष्टणकर यांच्या श्रद्धा, निष्ठा व चिकाटीचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले. कार्यक्रमास अडम ग्रामपंचायतचे उपसरपंच नामदेव बूराडे आणि ग्रामस्थ, भाविक भक्त व पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते



## नागेपल्ली येथे समक्का-सारक्का जत्रा मोठ्या उत्साहात साजरी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

अहेरी: तालुक्यातील नागेपल्ली येथील समक्का-सारक्का जत्रेला माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम सहपरिवार यांनी उपस्थिती दर्शवून आशीर्वाद घेतले. दरवर्षी प्रमाणे यंदाही नागेपल्ली येथे समक्का-सारक्का जत्रेचे आयोजन करण्यात आले.नागेपल्ली येथील समक्का-सारक्का मंदिरात भाविकांची मोठी गर्दी झाली असून नुकतेच माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रिशराव महाराज यांनी सहपरिवार मंदिरात भेट देत पूजाअर्चा करत मातेचे दर्शन घेऊन समस्त जनतेला सुख-शांती, समाधान व उत्तम आरोग्य लाभो अशी मातेकडे प्रार्थना केले. यावेळी स्थानिक भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त, जत्रेला आलेले भक्तगन मोठ्या संख्येने उपस्थित होते!

## कळंब तालुक्यातील शेळी गावातील कंत्राटी ग्रामसेवकाची आत्महत्या

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी :विरेंद्र चव्हाण



कळंब :-येथील अंबिका नगर मध्ये सुमित किन्नाके यांच्याकडे किरायाने राहत असलेल्या प्रतीक संतोष इंगळे वय २६वर्ष अविवाहित याने दि. २४ जानेवारी रोजी सकाळी किरायाच्या घरात आढ्याला दोर बांधून गळफास लावून आत्महत्या केली. प्रतीक हा मूळचा चांदूरबाजार बाजार येथील रहिवासी असून ग्रामपंचायत शेळी येथे कंत्राटी ग्रामसेवक म्हणून काम करून करत होता. आत्महत्येचे कारण अद्याप कळू शकले नाही. कळंब ठाणेदार राजेश राठोड तपास करीत आहेत.

# ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात ट्रॅव्हल्स उलटून अपघात

## चंद्रपूर - गडचिरोली राष्ट्रीय महामार्गावरील हिरापूर नजीकच्या टोल नाक्याजवळ घटना, 50 प्रवासी जखमी तर 20 प्रवासी गंभीर..!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

गडचिरोली : इतर गाडयांना मागे टाकण्याच्या नादात ट्रॅव्हल्स उलटून झालेल्या भीषण अपघातात तब्बल 50 प्रवासी जखमी झालेत. त्यात 20 प्रवासी गंभीर जखमी असून उर्वरितांना किरकोळ दुखापत झाली आहे.दिनांक,24 जानेवारी रोजी दुपारी 12:00.वा.च्या सुमारास चंद्रपूर - गडचिरोली राष्ट्रीय महामार्गावरील हिरापूर नजीकच्या टोल नाक्याजवळ घडली.

गडचिरोली येथील ट्रॅव्हल्स MH.04 GP 1736 नेहमी प्रमाणे क्षमतेपेक्षा जास्त,अंदाजे 60 ते 70 प्रवासी घेऊन चंद्रपूरहून गडचिरोलीकडे निघाली होती.हिरापूर टोल नाक्याजवळ अन्य गाड्यांना " ओव्हरटेक " करण्याच्या प्रयत्नात चालकाचे ट्रॅव्हल्स वरील नियंत्रण सुटल्याने ती उलटली. यात प्रवासी एकमेकांवर आदळून जखमी झालेत.घटनेची माहिती कळताच,पोलिस कर्मचारी,स्थानिक नागरिक व महामार्गावरील प्रवासी मदतीसाठी धावून आले. जखमींना तत्काळ बाहेर काढून सावली येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. त्यापैकी गंभीर जखमी प्रवाशांना पुढील उपचारासाठी गडचिरोली जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. काही जखमी प्रवाशी आपल्या सोयीप्रमाणे खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत.विशेष म्हणजे हिरापूर टोल नाक्याजवळ मागील आठवड्यात अज्ञात वाहनाच्या धडकेत दोन दुचाकीस्वारांचा जागीच मृत्यू झाला होता. ही घटना ताजी असतानाच, पुन्हा एकदा मोठा अपघात झाल्याने या परिसरातील वाहतूक सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर या मार्गावरून भरधाव व अवजड वाहनांची वर्दळ वाढली असून त्यामुळे अपघातांचे प्रमाणही वाढले आहे,अशी चर्चा नागरिकांमध्ये आहे. अपघातग्रस्त खासगी बस चालकाविरुद्ध कारवाई होणार का, तसेच क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक करण्याकडे प्रशासन लक्ष देणार का,असा प्रश्न उपस्थित झाला आहे.घटनेचा तपास सावली पोलिस करीत आहेत.



# मतदान हाच लोकशाहीचा कणा : मौशिखांब शाळेत प्रभात फेरीतून मतदार जागृतीचा एल्गार

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : मंगेश सहारे

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, मौशिखांब येथे लोकशाही सशक्त करण्याच्या उद्देशाने प्रभावी मतदार जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या प्रभात फेरीने संपूर्ण गावात "मतदान करा, लोकशाही वाचवा" असा ठाम संदेश दिला.

प्रभात फेरीनंतर मतदान केंद्रावर शिक्षक, विद्यार्थी व नागरिकांनी निर्भय, निष्पक्ष व प्रामाणिक मतदान करण्याची शपथ घेतली. या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील सजग मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकशाही मजबूत करण्यासाठी मतदार जागरूक असणे अत्यावश्यक असून, अशा उपक्रमांतून भावी मतदार घडविण्याचे कार्य मौशिखांब शाळेने केले आहे.






# किलोभर सोने 30 लाखांत देण्याचे आमिष; 5 लाख लुटणारे जाळ्यात

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

अमरावत : खोदकाम करत असताना आम्हाला एक किलो सोने मिळाले आहे. हे सोने अवघ्या तीस लाखात देतो, असे सांगून तळेगाव मोहना येथील एकाला तिवसा येथे बोलवण्यात आले. तो व्यक्ती पाच लाख रुपये घेऊन सोने खरेदीसाठी आला. त्यावेळी आरोपीपैकी एकाने त्याला बोलण्यात गुंतवले आणि इतर आरोपींनी कारमध्ये असलेली पाच लाखांची रोख लंपास केली.

ही घटना झाल्याचे गुरुवारी (दि. २२) समोर आले. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुरूवारीच रात्री गुन्हा दाखल होताच तत्काळ तीन आरोपींना अटक करून ४ लाख ४७ हजार रुपयांची रोख जप्त केली आहे. राजेश ऊर्फ श्याम सब्बर भोसले (३८, रा. काळागोटा), महेंद्र मुलीचंद भोसले (४४, रा. मार्डा) आणि जाजू दुवार चव्हाण (३५, रा. काळागोटा) या तिघांना पोलिसांनी अटक केली असून त्यांचे चार सहकारी पसार झाले आहेत.

पोलीस त्यांचाही शोध घेत आहेत. या प्रकरणात चांदूर बाजार तालुक्यातील तळेगाव मोहना येथील तौफिक अहमद खान गफ्फार यांनी तिवसा पोलिसात २२ जानेवारीला तक्रार दिली होती. तक्रारीनुसार, तौफिक अहमद खान यांच्या मित्राला एका अनोळखी व्यक्तीने फोन करून सांगितले की, खोदकाम करत असताना त्यांना एक किलो सोने सापडले आहे. ते सोने अवघ्या ३० लाखात आम्हाला विकायचे आहे, तुम्हाला हवे असल्यास आम्ही विकायला तयार आहे. हा व्यवहार करायचा असल्यास तिवसा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भांबोरा परिसरातील कालव्याजवळ बोलवले. त्यामुळे २१ जानेवारीला तौफिक खान व त्यांचा एक मित्र पाच लाख रुपये रोख घेऊन भांबोरा येथील कालव्याजवळ पोहोचले. त्यावेळी आरोपींनी सुरुवातीला त्यांना ओरीजनल सोन्याच्या दोन गिन्न्या दिल्यात. तेव्हा त्यांनी नकली सोन्याच्या गिन्न्या त्यांना दाखविल्या. ही बोलचाल सुरूच असताना अन्य आरोपींनी तौफिक खान यांनी सोबत नेलेल्या कारमध्ये असलेली पाच लाख रुपयांची रोख लंपास करुन तेथून पोबारा ठोकला. फसवणूक झाल्याचे लक्षात येतात तौफिक खान यांनी तिवसा पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी तक्रार प्राप्त होताच २२ जानेवारीला गुन्हा दाखल केला.या प्रकरणाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक करत होते. पोलिसांनी गुरुवारी दुपारच्या सुमारास राजेश भोसले, महेंद्र भोसले आणि जाजू चव्हाण यांना ताब्यात घेतले. सुरुवातीला त्यांनी घटनेबाबत नकार दिला. मात्र काही वेळानंतर त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली तसेच त्यांनी चोरलेल्या पाच लाख रकमेपैकी ४ लाख ४७ हजार ८०० रुपये, दोन मोबाईल तसेच एक किलो नकली गिन्न्या असा एकूण ४ लाख ६७ हजार ८०० रुपयांचा ऐवज पोलिसांनी जप्त केला आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख पीआय किरण वानखडे, तिवसाचे प्रभारी ठाणेदार आधारसिंह सोनोणे, पीएसआय मुलचंद भांबुरकर यांच्यासह पथकाने केली आहे.हिस्सेवाटण्या होण्यापुर्वीच पोलिसांनी केले ट्रॅप स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तपास सुरू करताच काळागोटा येथील आरोपींचा गुन्ह्यात समावेश असल्याचे समोर आले होते. त्या माहीतीच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला. चोरट्यांनी लूटलेल्या रकमेची हिस्सेवाटणी करण्यापुर्वीच पोलिसांनी त्यांना कुऱ्हा येथून रकमेसह ताब्यात घेतले होते.

# घुईखेडच्या जंगी शंकरपटाला मिळाली हिरवी झेंडी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

अमरावती : शंकरपटाला प्रशासनाकडून अखेर हिरवी झेंडी मिळाली आहे. बेंडोजी बाबा संस्थान व गावकरी मंडळ, घुईखेड यांच्या संयुक्त विद्यमाने २७ व २८ जानेवारी रोजी भव्यदिव्य जंगी शंकरपट व यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या शर्यतीत एकूण २ लाख ८५ हजार रुपयांच्या बक्षिसांची अक्षरशः लयलूट होणार असल्याने परिसरासह संपूर्ण राज्यातील बैलगाडी मालक व शौकीनांचे लक्ष या स्पर्धेकडे लागले आहे.

मंगळवारी २७ जानेवारीला सकाळी १०.३० वाजतापासून घुईखेड येथील बेंडोजी बाबा एमसीव्हीसी महाविद्यालयाच्या मागील मैदानावर शंकरपटाला सुरुवात होणार आहे. या स्पर्धेत 'अ' गटात प्रथम बक्षिस श्री संत बेडोजी बाबा संस्थान घुईखेडतर्फे ५१ हजार रुपये, व्दितीय बक्षिस मिलींद घुईखेडकर व डॉ. सतिश देशमुख (येरड) तर्फे ३१ हजार रुपये, तृतीय बक्षिस शेख रफीक शेख गफुर, घुईखेड तर्फे २१ हजार रुपये, चतुर्थ बक्षिस स्व. देशबंधु गुल्हाने स्मृती प्रित्यर्थ ॲड. चारूदत्त गुल्हाने यांच्या कडून ११ हजार रुपये, पाचवे बक्षीस प्रशांत देशमुख, सुरेश देशमुख व हरिहर वानखडे यांच्यातर्फे १० हजार रुपये, सहावे बक्षिस अनिल गायकवाड तर्फे ९ हजार रुपये, सातवे बक्षिस राजाभाऊ ढगे व बंडू बनकर तर्फे ८ हजार ५०० रुपये, आठवे बक्षिस शेखर पवार व तुषार बनकर तर्फे ७ हजार ५०० रुपये, नववे बक्षिस संतोष देशमुख व सुशील गावंडे तर्फे ६ हजार ५०० रुपये, दहावे बक्षिस पवन धामणकर व शेख समिर शेख नजीर तर्फे ५ हजार ५०० रुपये आणि ११ वे बक्षिस संतोष मुंधडा तर्फे ५ हजार रुपये देण्यात येणार आहे

# निर्मिती पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनी कु कार्तिकी भस्मे हिचे जिल्हा स्तरीय चित्रकला स्पर्धेत घवघवीत यश !

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : सुयोग गोरले

चांदुर बाजार : नवनीत प्रकाशन समूहातर्फे आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत निर्मिती पब्लिक स्कूलची गुणवंत विद्यार्थिनी कु. कार्तिकी संजय भस्मे (इयत्ता चौथी) हिने आपल्या उत्कृष्ट चित्रकलेच्या कौशल्याने जिल्हा स्तरीय गट 'ब' मध्ये प्रथम क्रमांक पटकावून शाळेच्या नावाला गौरव प्राप्त करून दिला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे तिची पुढील स्तरासाठी निवड झाली असून संपूर्ण शाळा परिसरात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. लहान वयातच कला क्षेत्रातील विलक्षण प्रतिभेचे दर्शन घडवत कार्तिकीने आपल्या कल्पकतेतून रंगांना शब्द दिले आणि कागदावर भावना जिवंत केल्या. तिच्या चित्रात दिसणारी सर्जनशीलता, रंगसंगती आणि विषयाची मांडणी परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेणारी ठरली. त्यामुळे तिला जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांकाचा मान मिळाला. या यशाबद्दल निर्मिती पब्लिक स्कूलचे अध्यक्ष मा. भास्करराव टोम्पे, श्री विजयराव टोम्पे, समन्वयक सौ. वैष्णवी टोम्पे मॅडम, शाळेचे मुख्याध्यापक तुषार खोंड सर, सहमुख्याध्यापक अजीम सौदागर सर तसेच तिच्या कला प्रतिभेला योग्य दिशा देणारे गायकी सर यांनी कार्तिकीचे मन:पूर्वक अभिनंदन केले. तसेच शाळेतील



सर्व शिक्षकवृंद, कर्मचारीवर्ग, पालकवर्ग आणि विद्यार्थ्यांनीही तिच्या यशाबद्दल गौरवोद्गार काढले. कार्तिकीच्या या यशामागे तिची सातत्यपूर्ण मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा पाठिंबा महत्त्वाचा ठरला आहे. तिच्या या कामगिरीमुळे निर्मिती पब्लिक स्कूलमधील विद्यार्थ्यांना कला क्षेत्रात प्रोत्साहन मिळाले असून शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आणि बहुआयामी विकासाची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. लहान वयात मिळालेले हे यश कार्तिकीसाठी नव्या प्रेरणेचे स्त्रोत ठरणार असून भविष्यात ती कला क्षेत्रात मोठी कामगिरी करेल, असा विश्वास शाळा व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे.

कु. कार्तिकी संजय भस्मे हिला आणि तिला मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांना निर्मिती पब्लिक स्कूल परिवारातर्फे मन:पूर्वक अभिनंदन व उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

# हिरपूर येथे कोल्हापुरी बंधाऱ्याचे लोकार्पण सोहळा

## आमदार हरीश पिंपळे यांच्या हस्ते उद्घाटन ; जलस्तरात वाढीसह सामाजिक प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

मूर्तिजापूर : मुर्तिजापूर तालुक्यातील शेतकरी आणि ग्रामस्थांसाठी वरदान ठरणाऱ्या, मृदा व जलसंधारण विभागाच्या वतीने बांधण्यात आलेल्या कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याचे लोकार्पण २२ जानेवारी २०२६ रोजी आमदार हरीश पिंपळे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. हा बंधारा केवळ सिंचनासाठीच नव्हे, तर पावसाळ्यात नाल्यामुळे खंडित होणाऱ्या दळणवळणाच्या आणि अत्यंत संवेदनशील अशा 'अंतिम यात्रे'च्या मार्गातील अडथळ्यावर कायमस्वरूपी उपाय ठरला आहे. पाण्याची साठवणूक आणि शेतीला संजीवनी या कोल्हापुरी बंधाऱ्यामुळे नाल्यातील वाहून जाणारे पाणी अडवले जाणार असून, परिसरातील विहिरी व बोअरवेलच्या भूजल पातळीत मोठी वाढ होणार आहे. रब्बी हंगामासाठी पाणी उपलब्ध झाल्याने पिकांच्या उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. 'जिवंत व मृतांनाही दिलासा': एका भावनिक प्रश्नाचे निराकरण



या प्रकल्पाचे सर्वात महत्त्वाचे आणि मानवी पैलू म्हणजे बंधाऱ्यासोबत बांधण्यात आलेला पूल. यापूर्वी पावसाळ्यात नाल्याला पूर आला की, अंत्ययात्रा गुडघाभर पाण्यातून न्यावी लागत असे. "मरणारा तर मरतोच, पण जिवंत नातेवाइकांनाही नरकयातना भोगाव्या लागतात," अशी ग्रामस्थांची वर्षानुवर्षांची भावना होती. या पुलामुळे आता अंतिम यात्रा सुरक्षित आणि सन्मानजनक पद्धतीने नेणे शक्य झाले आहे. यामुळे मृतांच्या आत्म्याला शांती आणि नातेवाइकांना मोठा मानसिक दिलासा मिळाला आहे. ग्रामस्थांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त "हा बंधारा केवळ पाण्याचा स्त्रोत नसून आमच्या वेदनांवरचा उपाय आहे," अशा भावना यावेळी सरपंच अमोल गडवे व ग्रामस्थांनी व्यक्त केल्या. या विकासकामाबद्दल आमदार हरीश पिंपळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.व नवनिर्वाचित नगराध्यक्ष हर्षल साबळे यांचाही सत्कार करण्यात आला कार्यक्रमाला मान्यवरांची उपस्थिती या सोहळ्याला नगराध्यक्ष हर्षल साबळे, राजकुमार नाचने, कोमल तायडे, कंत्राटदार पप्पू कांबे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मस्के, लक्ष्मणराव गावंडे, बंडू वानखडे, प्रवीण धामणे, अनिल ढगे, योगेश येणे, गजानन गावंडे, आशिष गावंडे, मनोज ढगे, रवी शिंदे, इरशाद अहमद, सागर वानखडे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. थोडक्यात पण महत्त्वाचे,२२ जानेवारी २०२६ कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा व पूल सिंचन सुविधेत वाढ आणि बारमाही रस्ता उपलब्ध.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
TODAY
गडचिरोली
GOOD MORNING

## जीवे मारण्याची धमकी देत शासकीय कामात अडथळा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

पुणे-सोलापूर रस्त्यावर राष्ट्रीय महामार्ग उपविभागाच्या अभियंत्याला मारहाण करून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी एका महिलेसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना शुक्रवारी मांजरीतील शेवाळवाडी पीएमपी बस आगार परिसरात घडली. याप्रकरणी राष्ट्रीय महामार्ग उपविभाग कार्यालयातील उपअभियंता राहुल रामकृष्ण कुलकर्णी (वय ५२) यांनी मांजरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे-सोलापूर रस्त्यावरील शेवाळवाडी परिसरात पीएमपीचे आगार आहे. या आगाराच्या परिसरात खासगी बस लावण्यात आली होती. ही जागा शासकीय असल्याने महामार्ग प्राधिकरणाचे पथक, ज्यात अभियंता अतुल सुर्वे आणि संभाजी लाखे यांचा समावेश होता, तेथे कारवाईसाठी गेले होते. पथकातील कर्मचाऱ्यांनी खासगी बसचे छायाचित्र काढले, तेव्हा कारवाई सुरू झाली. कारवाई सुरू असताना आरोपी महिला आणि तिचे साथीदार घटनास्थळी आले. महिलेने पथकाला, "तुम्ही या जागेत पाऊल कसे ठेवले? ही जागा माझी आहे, येथून चालते व्हा," अशी धमकी दिली. यानंतर महिलेसोबत असलेल्या एका साथीदाराने खासगी बसमध्ये ठेवलेले दांडके आणून उपअभियंता कुलकर्णी यांना बेदम मारहाण केली. आरोपींनी गोंधळ घालत जाणीवपूर्वक सदर ठिकाणी तणाव निर्माण करण्याची परिस्थिती केली.

## संक्षिप्त



### २०२५ ला झालेल्या रब्बी पिकांच्या नुकसानीचा तात्काळ मोबदला द्या

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी
प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज : दिनांक २३/०१/२०२६ रोजी तहसील कार्यालय आरमोरी येथे सन २०२५ रबि पिकांचे नुकसान झाले व शासन स्तरावर पंचनामे करुन शासनाकडे पाठपुरावा सुद्धा करण्यात आला. शासनाने त्या लाभार्थ्यांना नुकसानिचा लाभ अजुनपर्यंत मिळाला नाही. KYC चे बहाने सांगुन जवळपास एक ते दोन महीन्यापूर्वी KYC करून घेतले, तरी लाभार्थीच्या खात्याला पैसे जमा झाले नाही. तरी शासन शेतकऱ्यांची पिळवनुक करून घेत आहे. तरी शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन रब्बी पिक नुकसानीचे पैसे तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यामधे जमा करन्यात यावे, असे लाडे नायब तहसीलदार तहसील कार्यालय आरमोरी यांना निवेदन देताना विश्वेश्वर दर्रो तालुका अध्यक्ष आदिवासी सेल कांग्रेस कमेटी आरमोरी तसेच विनय भुसारी, तुळशिदास नंदेश्वर, दादाजी भोयर, रामदास गावळे, गजानन नवघडे, तामदेव सेलोटे, सुनितताई सपाटे, व नरोटीचक, विहीरगांव येथिल शेतकरी बांधव बहुसंखेने उपस्थित होते.



### कोटगल येथे नागोबा देवाची जत्रा मोठ्या उत्साहात साजरी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : गडचिरोली शहराला लागूनच असलेल्या कोटगल येथे गेल्या कित्येक वर्षापासून नागोबा देवाची जत्रा मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. त्याचेच औचित्य साधून आज दिनांक 24 जानेवारी 2026 रोजी कोटगल येथील नागोबा मंदिर येथे मोठ्या भक्ती भावांन आणि सर्व गावकरी व भाविक भक्तांच्या सहकार्याने नागोबा देवस्थान येथे मोठ्या उत्साहात जत्रेचे आयोजन करण्यात आले होते. आणि ते आनंदात आणि छान भक्तिमय वातावरणामध्ये संपन्न झाली. गावकऱ्यांच्या वतीने लोकांच्या मनोरंजनाकरिता कोटगल येथे तीन नाटकाचे आयोजन करण्यात आला असून गावामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.






### स्वच्छतेचा वसा, युवा पिढीचा ठसा'; तरुणांच्या पुढाकाराने कोटगल परिसर चकाचक

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : साथ फॉउंडेशन अतर्गत माऊली क्रिडा मंडळच्या तरुणाईच्या पुढाकाराने गडचिरोली शहराला लागूनच असलेल्या मौजा कोटगल येथील युवकानी "स्वच्छता हीच सेवा" हे ब्रीद घेऊन कोटगल या गावात 23 जानेवारी 2026 ला नोगोबा देव जत्रा निमित्य स्वच्छता अभियान राबवण्यात आले . आज सकाळी 7 वाजल्यापासून गावातील युवा व स्थायिक लोकांनी या मोहिमेत आतर्गत बस्टॉप पासून ते नागोबा देव मंदिर पर्यन्त स्वच्छता अभियान राबवण्यात आले. आजची युवा पिढी केवळ इंटरनेट आणि सोशल मीडियात दंग असते, हा समज खोटा ठरवत साथ फॉउंडेशन अतर्गत माऊली क्रिडा मंडळच्या येथील तरुणांनी स्वच्छतेचा हातात झाडू घेऊन अनोखा आदर्श घालून दिला आहे. या मोहिमेत युवकांनी मोठ्या संखेने सहभागी होऊन परिसराचा कायापालट केला. केवळ रस्ते झाडून न थांबता साचलेल्या प्लॅस्टिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यावर युवकांनी भर दिला.
या मोहिमेत ग्राम पंचायतचे सरपंच ममताताई दूधबावरे, ग्रामसेवक मारगाये, तंटामुक्त अध्यक्ष मोहन ठाकरे कोटगल, साथ फाऊनडेशनचे सचिव चेतन कोलते, मयूर बरसागळे, शेखर विरवार, माऊली क्रिडा मंडळचे अध्यक्ष आकाश भोयर, उपाध्यक्ष विकेश कारेते, सूमीत मोटघरे , कुणाल कांबळे, भूषण भोयर, विकास भोयर युवक तसेच स्थानिक लोक हजर होते.

### पुण्यात कौटुंबिक वादातून महिलेचा खून

पुण्यात कौटुंबिक वादातून एका 19 वर्षीय महिलेचा धारदार शस्त्राने वार करून खून करण्यात आला आहे. ही घटना नगर रस्त्यावरील वाडेबोल्हाई गावात घडली असून, पोलिसांनी तिचा पती शैलेंद्र प्रकाश व्हटकर (वय 30) याला अटक केली आहे. मृत महिलेचे नाव नम्रता शैलेंद्र व्हटकर (वय 19, रा. बालाजी सोसायटी, शिरसवाडी, वाडेबोल्हाई) असे आहे. तिचा पती शैलेंद्र व्हटकर (रा. बकोरी, ता. हवेली) याला लोणीकंद पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. शाहरुख दस्तगीर पठाण (वय 23) यांनी या प्रकरणी लोणीकंद पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी शैलेंद्र आणि नम्रता यांच्यात कौटुंबिक कारणांवरून नेहमी वाद होत असत. शैलेंद्रने नम्रताकडे सोन्याच्या दागिन्यांची मागणी केली होती, यावरून त्यांच्यात मोठा वाद झाला. याच वादातून शैलेंद्रने नम्रतावर धारदार शस्त्राने अनेक वार केले. गंभीर जखमी झालेल्या नम्रताला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु उपचारापूर्वीच डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

# रवींद्र तंगडपल्लीवार हत्याकांडाने गडचिरोली हादरली

## क्रूरकर्मा आरोपीला फाशीच द्या! आर्य वैश्य कोमटी समाजाचा एल्गार; अहेरी उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या माध्यमातून सरकारला निर्वाणीचा इशारा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी :
विनोद सेलोटे




अहेरी : निसर्गरम्य गडचिरोली जिल्ह्याला हादरवून सोडणाऱ्या नागेपल्ली येथील प्रतिष्ठित नागरिक श्री. रवींद्र तंगडपल्लीवार यांच्या निघृण हत्याकांडाने संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. एका निष्पाप व्यक्तीची ज्या क्रूरतेने हत्या करण्यात आली, ते पाहून माणुसकीही लज्जित झाली आहे. या अमानुष कृत्याचा निषेध नोंदवत, मुख्य आरोपी समय्या मलय्या सुंकरी याला तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी, या मागणीसाठी आर्य वैश्य कोमटी समाजाने आता रस्त्यावर उतरून न्यायाची मागणी केली आहे. पाशवी कृत्य, कुऱ्हाडीचे वार अन् छाटलेली बोटे घटनेची दाहकता अंगावर शहारे आणणारी आहे. १८ जानेवारी २०२६ रोजी बेपत्ता झालेले तंगडपल्लीवार १९ जानेवारीच्या सकाळी सिरोंचा रोडवरील नागमाता मंदिराजवळील जंगलात मृतावस्थेत आढळले. केवळ हत्या करून आरोपी थांबला नाही, तर त्यांच्या शरीरावर कुऱ्हाडीने खोलवर वार करण्यात आले आणि एका हाताची बोटे छाटण्यात आली. ही कृती आरोपीची गुन्हेगारी प्रवृत्ती आणि त्याच्या मनातील हिंस्त्र विकृती दर्शवते. अशा नराधमाला समाजात राहण्याचा कोणताही अधिकार नाही, अशी तीव्र भावना नागेपल्लीकरांनी व्यक्त केली आहे.

दुर्दैवाचा डोंगर; एका हत्येने घेतले तीन बळी! तंगडपल्लीवार यांच्या हत्येचे पडसाद केवळ एका मृत्यूपर्यंत मर्यादित राहिले नाहीत. त्यांच्या अंत्यविधीसाठी येत असताना सुरेश कोलपाकवार (बोरी) आणि यादव कोलपाकवार (आष्टी) या दोन नातेवाईकांचा दिना नदीच्या पुलावर भीषण अपघात झाला, ज्यात दोघांचाही मृत्यू झाला. या अपघाती मृत्यूलाही अप्रत्यक्षपणे हत्येची ती काळरात्रच जबाबदार आहे. एका हत्येमुळे तीन कुटुंबे उद्ध्वस्त झाल्याने परिसरातील जनमानसात हळहळ आणि संताप व्यक्त होत आहे.

प्रशासनाला निवेदन आणि मागण्यांचा पाढा आर्य वैश्य कोमटी समाज नागेपल्ली, आलापल्ली आणि अहेरीच्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी (SDPO) यांना दिलेल्या निवेदनातून प्रशासनाला ठणकावून सांगण्यात आले आहे की, आरोपीला फाशीच हवी, समय्या मलय्या सुंकरी याने केलेला गुन्हा 'रेअरेस्ट ऑफ द रेअर' (दुर्मिळातील दुर्मिळ) या श्रेणीत येतो, त्यामुळे त्याला फाशीच्या शिक्षेसाठी प्रयत्न व्हावेत. मास्टरमाईंडचा शोध घ्या, ही हत्या केवळ वैयक्तिक वादातून झाली की यामागे आणखी कुणी मोठे सूत्रधार आहेत, याचा पोलिसांनी सखोल तपास करावा.

फास्ट ट्रॅक कोर्ट पीडित कुटुंबाला न्याय मिळण्यासाठी हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्यात यावा. जिल्ह्यात पोलीस प्रशासनावर लक्ष हे निवेदन केवळ SDO यांनाच नाही, तर जिल्हा पोलीस अधीक्षक, राज्याचे मुख्यमंत्री आणि स्थानिक आमदार धर्मरावबाबा आत्राम यांनाही पाठवण्यात आले आहे. जर आरोपीवर कठोर कारवाई झाली नाही, तर समाज बांधव तीव्र आंदोलन छेडतील, असा इशाराही या निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदन सादर करतेवेळी आर्य वैश्य कोमटी समाजाचे अध्यक्ष, सचिव आणि अहेरी परिसरातील शेकडो समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. आता सरकार आणि पोलीस प्रशासन या क्रूर गुन्हेगाराला काय शिक्षा देते, याकडे संपूर्ण गडचिरोली जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## मौशिखांब जिल्हा परिषद शाळेची नागपूरला शैक्षणिक सहल

### ग्रामीण विद्यार्थ्यांना ज्ञान, विज्ञान आणि संस्कृतीची, सफर

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी :
मंगेश सहारे

मौशीखांब : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही शहरातील शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक वारशाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, या उद्देशाने मौशिखांब येथील जिल्हा परिषद शाळेच्या वतीने नागपूर येथे भव्य शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे शिक्षण केवळ वर्गापुरते मर्यादित न राहता अनुभवातून समृद्ध व्हावे, असा सकारात्मक संदेश देण्यात आला आहे. या शैक्षणिक सहलीसाठी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित व सुखकर प्रवासाकरिता विशेष बसची व्यवस्था करण्यात आली होती. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांना दिक्षाभूमी, द्वारका नगरी वॉटर पार्क, कोराडी मंदिर तसेच रमण विज्ञान केंद्र या ऐतिहासिक, धार्मिक व वैज्ञानिक महत्त्वाच्या स्थळांना भेट देण्यात येणार आहे. या सहलीत एकूण ६० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले असून सर्व विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. सहलीसाठी निघालेल्या बसला लाल फीत कापून व नारळ फोडून विधीवत रवानगी देण्यात आली. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जगदीश बोरकुटे, सदस्य शशिकांत कुकुडकर व इतर सदस्य उपस्थित होते. तसेच मुख्याध्यापक श्री. आवारी सर, भुरशे सर, चौधरी सर, गज्जलवार सर यांच्यासह पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. अशा प्रकारच्या शैक्षणिक सहलीमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, ज्ञानकक्षा रुंदावतात आणि शिक्षणाविषयी गोडी निर्माण होते, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरत असून शिक्षणाच्या गुणवत्तेत भर घालणारा असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.




## राणी दुर्गावती विद्यालय तथा महाविद्यालय आलापल्ली व दृष्टी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हळदी- कुंकवाचा कार्यक्रम

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी



आलापल्ली : राणी दुर्गावती विद्यालय तथा महाविद्यालय तथा दृष्टी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आलापल्ली येथे हळदी - कुंकवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला परिसरातील महिलांचा मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महिलांमध्ये आपुलकी, सामाजिक सलोखा तसेच भारतीय संस्कृतीतील पारंपरिक सणांचे जतन व्हावे, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दृष्टी फाउंडेशनच्या अध्यक्षा शाहीन हकीम या उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून केकिता बाळापुरे, प्राजक्ता विजय चौहान, मीना दुर्गे तसेच राणी दुर्गावती महाविद्यालयाचे प्राचार्य लोनबले सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाची प्रस्तावना कशाप मॅडम यांनी केली. त्यांनी हळदी-कुंकू कार्यक्रमाचे सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व विशद करून महिलांमधील एकोपा, स्नेहभाव व परंपरांचे जतन यावर मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महिलांनी सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित सर्व महिलांना पारंपरिक पद्धतीने हळदी-कुंकू लावून वाण वाटप करण्यात आले. खेळीमेळीच्या, आनंदी व उत्साही वातावरणात कार्यक्रम पार पडला. पारंपरिक गाणी, आपुलकीचे संवाद व हास्यविनोदामुळे महिलांनी कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी टे पाले मॅडम यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य केलेल्या सर्व मान्यवरांचे, आयोजकांचे, शिक्षकवर्गाचे व उपस्थित महिलांचे मनःपूर्वक आभार मानले. राणी दुर्गावती विद्यालय व दृष्टी फाउंडेशन यांच्या या संयुक्त उपक्रमाचे सर्वत्र कौतुक करण्यात आले. महिलांमध्ये सामाजिक बांधिलकी व सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारा हा कार्यक्रम शांततेत व उत्साहात यशस्वीरीत्या संपन्न झाले.

## २२ फेब्रुवारी ला विदर्भ राज्य आंदोलन समितीची सभा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी :
विनोद सेलोटे

गडचिरोली : अखंड महाराष्ट्रात राहून शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत, बेरोजगारांसाठी रोजगार निर्माण होणार नाही, बालकांचे कुपोषण आणि गरोदर मातांची हेडसाळ थांबणार नाही, विदर्भाचा औद्योगिक विकास होणार नाही, वैद्यकीय शिक्षण तंत्रशिक्षण यात सुधारणा होणार नाही , सिंचनाचा रस्त्याचा अनुशेष भरून निघणार नाही. कर्जबाजारी महाराष्ट्रात विदर्भाचा विकास अशक्य आहे याचा साकल्याने विचार करून विदर्भ राज्य आंदोलन समिती मागील पंधरा वर्षांपासून स्वतंत्र विदर्भ राज्याची निर्मिती याकरिता सातत्याने आंदोलन करीत आहे. स्वतंत्र विदर्भ राज्याची निर्मिती याकरिता पुन्हा एक आंदोलन विदर्भ निर्माण जन संकल्प लॉंग मार्च व मेळावा रविवार दिनांक 22 फेब्रुवारीला सकाळी 11 वाजता शहीद चौक नागपूर येथून लॉंग मार्च तिथुन दुपारी 2 वाजता चिटणीस पार्क नागपूर येथे विदर्भवाद्यांचा मेळावा संपन्न होत आहे. याचा प्रचार व प्रसिद्धी करता संत तुकाराम सार्वजनिक वाचनालय, जिजाऊ चौक, पोटेगाव बायपास रोड, गडचिरोली येथे दिनांक 25 जानेवारी 2026 रोज रविवारला दुपारी 1 वाजता सभेचे आयोजन केलेले आहे. विदर्भ राज्य आंदोलन समितीचे प्रमुख नेते एडवोकेट वामनराव चटप, पूर्व विदर्भ अध्यक्ष अरुण भाऊ केदार, उपाध्यक्ष सुनील चोखारे, माजी मंत्री रमेशजी गजबे, युवा आघाडी अध्यक्ष मुकेश मासुरकर, सुनील भोसले मार्गदर्शन करणार आहेत.

या सभेला विदर्भवादी जनतेने सहकाऱ्यासह उपस्थित असावे असे आवाहन जिल्हा समन्वयक अरुण मुनघाटे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र सिंह ठाकुर, अशोक पोरेड्डीवार, जिल्हा उपाध्यक्ष घिसु पाटील , शालिक नाकाडे, रमेश उप्पलवार, पांडुरंग घोटेकर, चंद्रकांत शिवणकर, पांडुरंग नागापुरे, प्रकाश ताकसांडे, गुरुदेव भोपये, वेणुदास वाघरे,महिला अध्यक्ष अमिता मडावी, सुनिता मडावी यांनी एका पत्रकातून केलेआहे.

## गडचिरोली जिल्ह्यात बिनागुंडा गावात नवीन पोलीस मदत केंद्राची स्थापना

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी :
विनोद सेलोटे




गडचिरोली : गडचिरोली जिल्ह्याच्या अतिदुर्गम आणि माओवादी दृष्टिकोनाने संवेदनशील असलेल्या भामरागड उपविभागातील बिनागुंडा गावात, पोलीस प्रशासनाने एक महत्त्वाचा पाऊल उचलत नवीन पोलीस मदत केंद्राची स्थापना केली आहे. २४ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या उद्घाटन सोहळ्यात गडचिरोली पोलीस दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला.

पोलीस मदत केंद्राची स्थापना करण्यासाठी गडचिरोली पोलीस दलाने एक मोठा फौजफाटा तैनात केला होता. १००० सी-६० कमांडो, ५०० विशेष पोलीस अधिकारी, १८ बीडीडीएस टीम आणि खाजगी कंत्राटदार यांच्या मदतीने २४ तासांच्या आत ही मदत केंद्र उभारली गेली. या केंद्रात पोलीस कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सर्व सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये वायफाय सुविधा, आर ओ प्लांट, मोबाईल टॉवर, पोर्टा कॅबिन आणि जनरेटर शेड यांसारख्या अत्याधुनिक सुविधांचा समावेश आहे.

बिनागुंडा गावातील नागरिकांच्या सुरक्षा आणि विकासासाठी या पोलीस मदत केंद्राची स्थापना महत्त्वाची ठरली आहे. यामुळे येथील लोकांना सुरक्षा, प्रशासनाची उपस्थिती, आणि विविध सरकारी योजनांचा लाभ मिळविण्याचा मार्ग मोकळा होईल. विशेषतः या क्षेत्रातील सुरक्षा पोकळी कमी करण्यासाठी नवीन पोलीस मदत केंद्र अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल.

सदर पोलीस मदत केंद्राच्या उद्घाटन कार्यक्रमात गडचिरोली पोलीस दलाचे प्रमुख अधिकारी, विशेष पोलीस महानिरीक्षक संदिप पाटील, पोलीस उप-महानिरीक्षक अंकित गोयल, आणि पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढवली. यासोबतच सीआरपीएफ आणि अन्य सुरक्षा दलांचे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते.

पोलीस मदत केंद्राच्या उद्घाटनाच्या वेळेस नागरिकांमध्ये जनजागरण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात बिनागुंडा गावातील महिलांना साडी, पुरुषांना धोतर, आणि युवकांना विविध साहित्य, शालेय साहित्य आणि खेळण्यांचे वाटप करण्यात आले. यामुळे स्थानिक समुदायाशी पोलीस दलाचे जवळीक वाढविण्यात आले.

### आत्मनिर्भर आणि सुरक्षित भविष्य

■ नवीन पोलीस मदत केंद्राच्या स्थापनेसह, गडचिरोली पोलीस दलाच्या नागरी कृती उपक्रमांद्वारे या भागातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. पोलीस मदत केंद्रामुळे येथील माजी संपर्क तुटलेले गावही आता सुरक्षा आणि प्रशासनाच्या दृष्टीने मुख्य प्रवाहात येणार आहेत.

### सुरक्षा आणि विकासासाठी नवा मार्ग

■ पोलीस मदत केंद्राच्या स्थापनेसह, गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागातील नागरिकांना राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी सुरक्षा मिळणार आहे. यामुळे आगामी काळात राष्ट्रीय महामार्गाची कामे पूर्णत्वास जाऊ शकतात. तसेच, या भागातील मोबाईल टॉवरच्या रखडलेल्या कामांना गती मिळणार आहे, आणि भविष्यात एसटी बस सेवा सुरू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नवीन पोलीस मदत केंद्राच्या उभारणीसाठी संपूर्ण पोलीस दलाचे आभार व्यक्त करण्यात आले.